७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १७ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## मनोज जरांगेंचे ३० तारखेपासून पुन्हा उपोषण

■ फडणवीसांना मराठ्यांनीच मुख्यमंत्री केले, पण समाजाचे वाटोळे होणार असेल तर शांत बसणार नाही ■

आंतरवाली (दै. संध्या)



माझे देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल वाईट मत नाही. पण माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी तुम्हाला कोणालाच मोजणार नाही. मला मित्र नको, मंत्र्यांशी संबंध नको मला केवळ माझ्या समाजाचे लेकरं मोठी करायची आहेत. मी फडणवीस यांना दोष देत नाही माझं म्हणणं केवळ इतके आहे की हैदराबादचा जीआर काढला पण प्रमाणपत्र का रोखले? ते आता बंद कसे झाले? तुम्हाला मुख्यमंत्री मराठ्यांनीच केले आहे हे लक्षात ठेवा, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. 30 तारखेपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. 30 मे पूर्वी सर्वांना प्रमाणपत्र द्यावे, नाही तर 30 तारखेपासून आमरण उपोषण करणार, असे त्यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणासाठी सरकारने सातारा संस्थानच्या गॅझेटचा जीआर काढू असे सरकारने सांगितले होते पण तसे काही केले नाही, आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही. हैदराबाद गॅझेटनुसार 308 का असेना नोंदी निघाल्या ना? अधिकारी सांगतात सरकारने आदेश दिले नाही, मग काय आमच्या पोरांचे वाटोळे झाल्यावर सरकार आदेश देणार का? असा सवाल मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांना वाटत असेल की तेच हुशार आहेत पण शेतकरी सुद्धा फार हुशार आहे. तुम्ही आमचे प्रमाणपत्रे रोखले आहे. प्रमाणपत्र सरकारने रोखले आहेत. फडणवीस यांनी एक भाषण केले होते की मंत्र्यांना किंमत नाही, मुख्यमंत्रीच सर्व काही असतो. मग आमचे प्रमाणपत्र सुद्धा तुम्हीच रोखले आहेत. सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर लागू झाला आहे. कुणबी प्रमाणपत्र देणं अचानक का बंद झाले. तुम्ही प्रमाणपत्र द्या आणि समाजाचे मन जिंका आम्हाला सत्ता नको. फडणवीस तुम्ही नाही तुमच्या 50 पिढ्या जरी आल्या तरी मी मराठ्यांना धक्का सुद्धा लागू देणार नाही. मनोज जरांगे म्हणाले की, आंदोलनाच्या तारखेच्या आत जर कुणबी प्रमाणपत्र दिले नाही तर भयानक आंदोलन होणार. 58 लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्याचे प्रमाणपत्र वाटप करा. काम करा नाही तर सर्वांना पट्ट्यावर घेतो. प्रमाणपत्र दिल्याशिवाय सरकारला सुटी नाही. सातारा संस्थानचा जीआर तुम्ही का काढत नाही? असा सवाल सुद्धा जरांगे यांनी केला आहे. आम्ही तुम्हाला बराच वेळ दिला आहे आता तुम्हाला वेळ देऊ शकत नाही. 1994 ला जसा जीआर काढला होता तसाच जीआर काढावा. ओबीसींना तेव्हा जसे आरक्षण मिळाले तसे आम्हाला का मिळत नाही. मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाचे मुले अधिकारी होताय म्हणून सरकार जळायला लागले आहे. म्हणून ते समाजाला प्रमाणपत्र देत नाही. मराठ्यापुढे शहानपण चालत नाही. सरकारकडून मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ सुरू आहे. सरकारला आपल्या मराठा समाजाबद्दल इतका द्वेष का आहे? मराठा समाजाचे नेते जर पक्षाच्या बाजूने राहिले तर तुमच्या मुलांचे नुकसान होईल. पक्ष वाढवण्याच्या नादात जात वाढणार नाही. म्हणून पक्षाचा नाही तर आपल्या लेकरांचा विचार करा.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आज त्या विषयावर 11 वाजता सर्वांशी चर्चा करू आणि ठरवू. पण आंदोलन केल्याशिवाय सरकार काही वटणीवर येत नाही. सरकारकडून गोड बोलून फसवण्याचे काम अनेक वेळा झाले आहे. पण राज्यात मराठ्यांची मोठी ताकद आहे. ती सरकारने बघितली आहे.

## ब्यूटी पार्लर ते खासगी हेलिकॉप्टरचे बील

*अजित पवार गटातील ती महिला कोण? नव्या चर्चांना उधाण!*

मुंबई (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अजित पवार आणि शरद पवार गट वेगळे झाल्यानंतर आता अजित पवार गटामध्ये (सत्ताधारी गट) तीव्र अंतर्गत संघर्ष निर्माण झाल्याचे चित्र आहे. पक्षाची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर आणि पक्षाच्या तिजोरीची सूत्रे पूर्णपणे पवार कुटुंबाच्या हातात गेल्यानंतर अंतर्गत गटबाजी कमालीची वाढली असून, विविध थरातील वाद आता थेट चव्हाट्यावर आले आहेत. रोहित पवार यांनी केलेल्या काही सूचक विधानांमुळे आणि पक्षांतर्गत झालेल्या मोठ्या बदलांमुळे राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. अजित पवार गटाच्या अर्थकारणावर आणि पक्षाच्या निधीवर आता पूर्णपणे पवार कुटुंबाचे नियंत्रण आले आहे. या आर्थिक बदलांनंतर आमदार रोहित पवार यांनी एक अत्यंत सूचक आणि खळबळजनक विधान केले. पक्षाच्या तिजोरीची चावी पवार कुटुंबाकडे आल्यामुळे "आता येत्या काळात ब्यूटी पार्लर किंवा खासगी प्रवासासाठी हेलिकॉप्टर वापरणे हे पक्षाच्या खर्चात येणार नाही," असे त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी एका वरिष्ठ महिला नेत्या किंवा संबंधित व्यक्तीने स्वतःच्या ब्यूटी पार्लरचे हजारो रुपयांचे बिल थेट पक्षाच्या निधीमधून भागवले होते असे म्हटले जात आहे. आता ही महिला नेता नेमकी कोण आहे? याचे वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत. सोशल मीडियातही याची खमंग चर्चा रंगलेली पाहायला मिळत आहे. एवढेच नव्हे तर नेत्यांच्या खासगी प्रवासासाठी वापरण्यात येणाऱ्या हेलिकॉप्टरची (चॉपर्स) बिले आणि मुंबईत स्वतःची व्यवस्था असतानाही तिथल्याच अलिशान हॉटेल्सची लाखो रुपयांची बिले पक्षनिधीतून भरली जात असल्याचेही म्हटले जात आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## भिकारी म्हणता म्हणता पाकिस्तानचा थक्क करणारा निर्णय

मुंबई (दै. संध्या)



अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे संपूर्ण जगात इंधनाची टंचाई निर्माण झाली आहे. भारतात तर घरगुती गॅस सिलिंडरपासून ते पेट्रोल, डिझेलची किंमत वाढली आहे. परिस्थिती अशीच राहिली तर देश अडचणीत सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हीच बाब लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील नागरिकांनी काटकसरीने वागावे असे आवाहन केले आहे. दरम्यान, एकीकडे भारतात काटकसरीने वागण्याचे आवाहन केले जात असताना दुसरीकडे पाकिस्तानने मात्र मोठा निर्णय घेतला आहे. भारतात पेट्रोल, डिझेलची किंमत वाढली आहे. परंतु पाकिस्तानने मात्र या दोन्ही इंधनांची किंमत थेट कमी करून टाकली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तान सरकारने पेट्रोल आणि डिझेलची किंमत कमी केली आहे. सरकारने या दोन्ही इंधनांचा भाव 5 रुपयांनी कमी केला आहे. या निर्णयानंतर आता पाकिस्तानात पेट्रोलचा भाव 409.78 पाकिस्तानी रुपये प्रति लिटर आणि हाय-स्पीड डिझेलचा भाव 409.58 पाकिस्तानी रुपये प्रती लिटर झाला आहे. 28 फेब्रुवारी रोजीपासून इराण आणि अमेरिका यांच्यात युद्ध सुरू झाले. तेव्हापासून पाकिस्तानात इंधनाचा भाव कधी कमी होतोय तर कधी वाढतोय. गेल्याच आठवड्यात पाकिस्तानने पेट्रोलचा भाव 14.92 पाकिस्तानी रुपयांनी तर हाय-स्पीड डिझेलचा भाव 15 रुपये पाकिस्तानी रुपयांनी वाढवला होता. 6 मार्च रोजीदेखील पाकिस्तानने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत 55 रुपयांनी (पाकिस्तानी) वाढ केली होती. पाकिस्तानने सध्या पेट्रोल आणि डिझेलचा भाव कमी केला असला तरीही भारतात मात्र स्थिती वेगळी आहे. भारतात चार वर्षांनी तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत 3 रुपयांनी वाढ केली आहे. 2022 सालापासून पेट्रोल आणि डिझेलचा भाव स्थिर होता.

## पटेल-तटकरे आमचेच नेते, पक्षात कोणतेही मतभेद नाहीत

*दिल्ली कार्यालयात कोणालाही रोखले नाही, अविनाश आदिकांचे स्पष्टीकरण*

मुंबई (दै. संध्या)





सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांतर्गत गेल्या काही दिवसांपासून सर्वकाही आलबेल नसल्याच्या चर्चांना अखेर पक्षाने पूर्णविराम दिला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पक्षातील ज्येष्ठ नेत्यांमध्ये मतभेद असल्याच्या बातम्या, तसेच प्रफुल पटेल व सुनील तटकरे यांना दिल्लीतील पक्ष कार्यालयात प्रवेश नाकारल्याच्या वृत्ताचे राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक आणि प्रवक्ते उमेश पाटील यांनी जोरदार खंडन केले आहे. मुंबईत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत अशा बातम्या देणाऱ्या संबंधित वृत्तपत्रावर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या ज्येष्ठ नेते सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांना साईडलाईन करण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच आज या दोन्ही नेत्यांच्या एका जवळच्या नेत्याला दिल्लीतील राष्ट्रवादीच्या कार्यालयात रोखून धरण्यात आल्याची घटना घडली आहे. या नेत्याला पक्षाविषयी गैरसमज न पसरवण्याची कथित तंबीही देण्यात आल्याचीही माहिती आहे. या घटनाक्रमामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सर्वकाही आलबेल नसल्याची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. या चर्चांवर राष्ट्रवादीचे नेते अविनाश आदिक आणि उमेश पाटील यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले आहे

पत्रकार परिषदेत बोलताना अविनाश आदिक म्हणाले, "मी पक्षाचा राष्ट्रीय सचिव असून दिल्लीतील कार्यालयाचे कामकाज पाहतो. गेल्या काही आठवड्यांच्या खंडानंतर मी कालच दिल्ली कार्यालयात गेलो होतो. मात्र, एका वृत्तपत्राने माझ्या नावाने अत्यंत चुकीची आणि खोडसाळ बातमी छापली. मी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना दिल्ली कार्यालयात येण्यास बंदी घातल्याचा दावा या बातमीत केला होता. हा सर्व प्रकार माझ्या आणि पक्षाच्या विरोधात जाणीवपूर्वक रचलेला कट आहे. आम्ही कायदेशीर सल्ला घेत असून संबंधित वृत्तपत्रावर लवकरच अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार आहोत." पक्षाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी देखील अंतर्गत वादाचे वृत्त फेटाळून लावले. "सुनील तटकरे हेच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आहेत आणि राहतील. तसेच प्रफुल पटेल हे पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत. पक्षाची नवी राष्ट्रीय कमिटी नुकतीच जाहीर झाली असून, आगामी काळातील सर्व संघटनात्मक निर्णय ही कमिटीच घेईल. त्यामुळे माध्यमांनी चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये," असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उमेश पाटील यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर अत्यंत गंभीर आणि वैयक्तिक पातळीवर आरोप केले. "रोहित पवार हे राजकीय फायद्यासाठी अजित पवार यांच्या नावाचा वापर करत असून त्यांनीच दादांचा सर्वाधिक छळ केला आहे. बारामती ही अजितदादांची राजकीय राजधानी आहे, मात्र रोहित पवारांचा डोळा आता बारामतीवर आहे," असा घणाघात पाटील यांनी केला.

पुढे बोलताना ते म्हणाले, "अजित पवारांच्या विमान अपघाताच्या चौकशीवरून रोहित पवार केवळ राजकारण करत असून दादांची राजकीय 'लीगसी' (वारसा) हिरावून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांनी आमच्या पक्षाची काळजी करू नये. शरद पवार गटातील अनेक आमदार आणि खासदार आजही संपर्कात असून आमच्या पक्षात येण्यास उत्सुक आहेत, मात्र आम्ही अद्याप त्यांना पक्षात घेण्याचा निर्णय घेतलेला नाही," असा खळबळजनक दावाही त्यांनी यावेळी केला.


### ढिंग-टांग




### पुण्यातून प्राध्यापिका मनीषा मांढरे यांना अटक; 'बायोलॉजी'चे प्रश्न फोडल्याचा आरोप

## नीट प्रकरणात आणखी एक अटक

पुणे (दै. संध्या)



वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या 'नीट-युजी 2026' परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाला आता एक नवे आणि धक्कादायक वळण मिळाले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेल्या पुण्यातील मनीषा गुरुनाथ मांढरे या प्राध्यापिकेला दिल्लीतून अटक केली आहे. या अटकेमुळे परीक्षा यंत्रणेतील अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनीषा मांढरे या पुण्यात वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विषयाच्या वरिष्ठ प्राध्यापिका म्हणून एका महाविद्यालयात कार्यरत होत्या. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने त्यांची नीट परीक्षेसाठी विषय तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. या पदाचा फायदा घेत त्यांना वनस्पतीशास्त्र आणि प्राणिशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांची पूर्ण माहिती आणि ॲक्सेस मिळाला होता. मात्र, त्यांनी या गोपनीयतेचा भंग करून परीक्षेची विश्वासार्हता धोक्यात आणली.

सीबीआयच्या तपासात समोर आले की, एप्रिल 2026 दरम्यान मनीषा मांढरे यांनी पुणे येथील मनीषा वाघमारे (जिच्यावर 14मे रोजी आधीच कारवाई झाली आहे) हिच्या मदतीने काही निवडक परीक्षार्थींना एकत्र केले. मांढरे यांनी आपल्या राहत्या घरी या विद्यार्थ्यांसाठी विशेष 'कोचिंग क्लासेस' घेतले. या वर्गांमध्ये त्यांनी प्रत्यक्ष परीक्षेत येणारे प्रश्न विद्यार्थ्यांना लिहून दिले आणि त्यांच्या पाठ्यपुस्तकात खुणा करून दिल्या. 3 मे 2026 रोजी झालेल्या प्रत्यक्ष परीक्षेतील बहुतांश प्रश्न मांढरे यांनी आधीच दिलेल्या प्रश्नांशी तंतोतंत जुळले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणाच्या संदर्भात सीबीआयने आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर येथून 9 आरोपींना अटक केली आहे. यापैकी 5 आरोपी महाराष्ट्रातील नाशिक, पुणे व अहिल्यानगर येथील रहिवासी आहेत. पुण्यातील रहिवासी असलेल्या पी.व्ही. कुलकर्णी यांची या संपूर्ण कारस्थानाचे सूत्रधार (मास्टरमाइंड) म्हणून ओळख पटली आहे. कुलकर्णी हा लातूरच्या एका महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरीस होता. नऊ आरोपींपैकी पाच जणांना न्यायालयात हजर करण्यात आले असून, त्यांना 7 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, गुरुवारी अटक करण्यात आलेल्या अन्य दोन आरोपींना पुणे न्यायालयाकडून 'ट्रान्झिट रिमांड'वर दिल्लीला आणण्यात आले आहे. त्यांना सध्या दिल्लीतील एका न्यायालयासमोर हजर केले जात आहे.

गेल्या 24 तासांत, सीबीआयने देशभरातील सहा ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान अनेक महत्त्वाची कागदपत्रे, लॅपटॉप, बँक स्टेटमेंट आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले. ही जप्त केलेली सामग्री आता तपास यंत्रणेकडून फॉरेन्सिक आणि डिजिटल तपासणीसाठी पाठवण्यात आली आहे.

पी.व्ही. कुलकर्णी (रसायनशास्त्र प्राध्यापक) आणि मनीषा मांढरे (वनस्पतिशास्त्र शिक्षिका): हे दोघे थेट NTA च्या संपर्कात होते. त्यांनी एका कोचिंग इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांना परीक्षेतील प्रश्न उघड केले. मनीषा वाघमारे: तिने या दोन्ही प्राध्यापकांशी संपर्क साधला. तिने त्यांच्याकडून परीक्षेची प्रश्नपत्रिका मिळवली आणि कोचिंग इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांना प्रश्न सांगण्यास सुरुवात केली. तसेच, अभ्यासासाठीच्या नोट्स तयार करण्यातही तिने मदत केली. मनीषा वाघमारे ही पुण्याचीच रहिवासी आहे.

धनंजय लोखंडे: त्याची मनीषा वाघमारेशी ओळख होती. त्याने तिच्याकडून NEET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेशी संबंधित साहित्य मिळवले.

शुभम खैरनार: धनंजय लोखंडेने परीक्षेचे प्रश्न शुभम खैरनारकडे पाठवले. 29 एप्रिल 2026 रोजी, शुभमने या प्रश्नांची एक PDF फाईल तयार केली, जी 'टेलीग्राम' (Telegram) द्वारे प्रसारित करण्यात आली.

यश यादव: शुभमने ती PDF फाईल गुरुग्रामचा रहिवासी असलेल्या यश यादवकडे पाठवली. या बदल्यात त्याला 15 लाख रुपये मिळाले. या दोघांमधील WhatsApp संभाषणाचे (चॅटचे) पुरावेही जप्त करण्यात आले आहेत.



# संपादकीय


## ‘आनंद’ मरा नहीं, आनंद कभी नहीं मरते...!

काल पहाटे पाच वाजता डॉ. आनंद नाडकर्णी गेले. पोटातल्या कॅन्सरसाठी त्यांचे मोठे ऑपरेशन आठवड्यापूर्वीच झाले होते. त्यातून त्यांची उत्तम सुधारणा होत असतांना ते अचानक गेले. म्हणून अधिक धक्कादायक. आनंदचे स्मरण महाराष्ट्र काय म्हणून करेल? मानसरोग उपचार तज्ज्ञ म्हणून त्याने हजारो रुग्णांचा उपचार केला. त्यांच्या जीवनात आशा आणली. ठाण्याला इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ (IPH) नावाची मानसिक आरोग्यावर व्यापक काम करणारी संस्था स्थापन केली. डॉ. सुनंदा व अनिल अवचट यांनी पुण्याला सुरू केलेल्या ‘मुक्तांगण’ व्यसनमुक्ती केंद्राच्या स्थापनेपासून त्याचा सहभाग होता. ते दोघे गेल्यावर तर तो मुक्तांगणचा मुख्य मार्गदर्शक व आधारस्तंभ होता. गडचिरोलीत आमच्या ‘सर्च’ संस्थेद्वारे चालविल्या जाणाऱ्या व्यसनमुक्ती उपचाराच्या कामाचाही तो सल्लागार होता. शोधग्रामला आला असतांना एका भेटीत रात्री त्याने इथल्या व्यसनींसाठी एक प्रार्थना-गीत लिहिले. ‘चांदव्याची दिवली लागे उभ्या अंधारात.’ ती प्रार्थना अनेक वर्षे आमचे व्यसनी-रुग्ण म्हणत असत.

तो डॉक्टर होता. कवी होता. नाटककार होता. चित्रपटाचा कथा-लेखक होता. जवळपास दोन डझन लोकप्रिय पुस्तकांचा तो लेखक होता. मराठी वाचकांना ‘मानसशास्त्र’ विषयाची हसत-खेळत व जिवंत ओळख त्याने करून दिली. पण आनंद सर्वात जास्त खुलायचा तो स्टेजवर!

‘वेध’ सारखे उपक्रम त्याने महाराष्ट्राच्या अनेक शहरात नेले. त्यात जवळपास तीन दिवस तो वक्ता, सूत्रधार, मुलाखातकार, गायक व प्रेरणास्त्रोत सर्व काही होता. महाराष्ट्रातील लाख-दोन लाख किशोरवयीन मुली-मुले व त्यांचे पालक यांना ‘मी पुढे काय होऊ ?’ या प्रश्नाचा वेध घेण्यास त्याने मदत केली.यशस्वी-अयशस्वी माणसांच्या वेगळ्या वाटांची कहाणी त्यांच्या तोंडून कुशलपणे वदवून घेणारा तो उत्तम मुलाखातकार होता. माणसाच्या आतला माणूस स्टेजवर बाहेर प्रकट व्हायला आनंद नाजूकपणे मदत करायचा. माझ्या अनेक जाहीर मुलाखती त्याने घेतल्या आहेत. प्रश्न विचारायचे त्याचे कौशल्य अनुभवण्यासारखे असायचे. थोडक्यात, पुलं चे करण्यात आलेले वर्णन ‘बहुरूपी’ आनंदला चपखल लागू पडायचे.

अनेक संकटे त्याने झेलली. लहानपणी पोलियोसारखा रोग व आलेली मर्यादा, नंतर दोन्ही पायांवर हत्तीपाय सारखी त्रासदायक सूज, बांधाव्या लागणाऱ्या पट्ट्या, वजनवाढ,



हे सर्व अंगावर घेऊन व सोसूनही तो कायम आनंद व उत्साहाचा झरा होता. सदैव हसतमुख. पंचावन्न वर्षांपूर्वी हृषिकेश मुखर्जींनी एक अमर सिनेमा बनवला होता, आनंद. तो चित्रपट त्यांनी राजकपूरला अर्पण केला होता. वस्तुत: तो चित्रपट आपल्या आनंदाला तंतोतंत लागू पडला असता. अगदी, त्यात नायकाला झालेल्या पोटाच्या कॅन्सरपर्यंत. त्या चित्रपटाचा शेवट अमिताभ बच्चनच्या आवाजात होतो. तो आवाज म्हणतो “आनंद मरा नहीं. आनंद कभी नहीं मरते!”

## संस्कृत सुभाषित

अति परिचयात् अवज्ञा...

अर्थ – आपली मर्यादा आपण सांभाळली पाहिजे. नाही तर मग आपला दर्जाही सांभाळणे शक्य होत नाही.

## गुरु वचन

### सर्वांमध्ये प्रिती तत्व – ओशो

आपल्या प्रत्येकात ’प्रिती’ नावाचे तत्व आहे, ज्याच्या आधारावर आपण जगतो. आपण चुक जगत असलो तरी ’प्रिती’च्या आधारावर जगत असतो.

पैसे कमावणाऱ्याची पैशांवर प्रिती असते. कुणी पदाच्या मागे धावत असेल पद गौण आहे पण प्रतिष्ठेवर प्रिती आहे. जिथे शोधाल तिथे तुम्हाला प्रिती सापडेल. कुणी वेश्यालयात गेले व एखाद्याने कुणाची हत्या केली. पापी माणसात व पुण्यात्मातही तुम्हाला प्रिती एकसाथ पाहण्यास मिळेल. मग प्रिती कुणासोबत झाली, त्याचे प्रकार पडतात. पैशावर लागली तर तुम्ही पैसेच होऊन जातात. कागदाच्या सडक्या नोटा होऊन मरतात.

हे मोठे पायाभूत सत्य आहे, यास हृदयात सांभाळून ठेवा. प्रिती महागडा सौदा असल्याने कुणासोबतही करु नका. प्रितीचा अर्थ – मी हे होऊ इच्छितो, असा होतो. राजनेता गावात आले व तुम्ही एकत्र जमून त्यांचे स्वागत केले. का केले? कारण तुमची इच्छा असते की, माझ्याकडेही पद असावे, प्रतिष्ठा असावी म्हणून पद व प्रतिष्ठेची पूजा आहे. एखादा भिकारी गावात आला व तुम्ही पोहोचले. त्याच्यासोबत तुमची प्रिती असल्याचे वृत्त मिळते की, भिकारी होण्यासाठी आतूर आहेस–कधी येईल तो मुक्तीचा क्षण, जेव्हा सर्व सोडून...कुठल्याही वस्तूवर माझी पकत्रड राहणार नाही. कुणी संगीत ऐकले तर हळुहळु त्याच्या हालचालीत संगीत दिसू लागते. तुम्ही ज्यावर प्रिती कराल तसे व्हाल.

प्रिती तत्वात रसायन असून प्रितीशिवाय कुणी राहू शकत नाही. प्रिती श्वासाप्रमाणे गरजेची आहे. जसे शरीर श्वासावर जगते, आत्मा प्रितीवर जगतो म्हणून जर तुमच्या जीवनात प्रिती नसेल किंवा तुमचा प्रितीचा सेतू तुटेल तेव्हा तुम्ही आत्महत्या कराल. घरास आग लागली व सर्व पैसे जळाले आणि तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, हे घरच मी होतो व हेच माझी प्रिती होती. आता हेच नसल्यावर माझ्या राहण्यास काय अर्थ! तुमची पत्नी मरण पावली व तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, तिच माझ्या प्रितीचा आधार होती. माझा संसार उद्ध्वस्तच झाला. आता माझा जगून काही उपयोग नाही.

आपण प्रितीशिवाय जगू शकत नाही. जसे श्वासाविना शरीर राहत नाही तसे प्रितीविना आत्मा राहत नाही. मग चुकीने प्रिती झाली तरी आत्मा टिकून राहते.

प्रितीचे अनेक प्रकार लक्षात घेतले पाहिजे. एक प्रिती जी तुमच्या पत्नीवर असते, मित्रांवर असते, पतीवर असते, भाऊ–बहिणीत असते. त्या प्रितीला आपण प्रेम संबोधतो.

आणखी एक प्रिती असते. जी आई–वडिल किंवा गुरुंप्रती असते, त्यास श्रद्धा म्हणतात. कुणी तुमच्यापेक्षा मोठे आहे. प्रितीला डोंगरावर चढावे लागते म्हणून श्रद्धा कठीण असते. श्रद्धेत डाव खेळावा लागते. श्रद्धेत चढाई असल्याने फार कमी लोकांमध्ये पाहण्यास मिळते. आई–वडिलांवर कोण प्रिती करतो! लोक कर्तव्य पार पाडताना दिसतात. मग प्रिती कुठे गेला? आपल्यापेक्षा मोठ्यांवर प्रिती करण्यात डोंगर चढण्याची हिम्मत असायला हवी व लक्षात ठेवा की, तुम्ही आपल्यापेक्षा मोठ्यांवर जेवढी प्रिती कराल तेवढे तुम्ही वर जाल. तुमच्या चेतना ऊर्ध्वगामी होतील म्हणून आम्ही श्रद्धेला खुप महत्व देतो. श्रद्धा माणसाला बदलते.

ज्याच्या जीवनात श्रद्धा नाही त्याच्या जीवनात विकास नसतो.

आपल्यापेक्षा छोट्यांवर असलेल्या प्रितीस स्नेह म्हणतात. छोट्यांप्रती सच्ची प्रिती तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपली मोठ्यांवर श्रद्धा असते. ज्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा मोठ्यांप्रती श्रद्धा आहे, सम्यक श्रद्धा आहे, त्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा छोट्यांप्रती सम्यक स्नेह असतो व त्या व्यक्तीच्या जीवनात आमुलाग्र बदल होतो–आपल्या समवयीनांप्रती सम्यक प्रेम असते. त्याच्या जीवनात प्रेमाचा छंद बांधला जातो.

## पंचांग

| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०८२ | योग:अतिगण्ड |
| अधिक ज्येष्ठ शके | २५:५९:१५+ |
| संवत्– १९४८ | करण:किस्तुघ्न |
| संवत्सर –पराभवनाम | ११:३६:२१ |
| अयन– उत्तरायणारंभ | करण:बव २१:४१:०१ |
| मास– अधिक ज्येष्ठ | सूर्य:वृषभ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | चन्द्र:वृषभ |
| शुक्ल पक्ष | हिजरी सन् – १४४६ |
| तिथि:प्रतिपदा २१:४१:०१ | मुस्लिम मास – जिल्काद |
| नक्षत्र:कृत्तिका १४:३१:५० | तारीख – ३० |
| योग:शोभन ०६:१५:०० | विशेष |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 8 | | | 5 | | 9 | |
| | 5 | | 4 | 1 | | 6 | 2 | |
| | | 7 | | | | | | |
| 7 | 8 | | | | 6 | | | |
| | 4 | 1 | | 9 | | 3 | 6 | |
| | | | 7 | | | | 5 | 1 |
| | | | | | | 2 | | |
| | 3 | 4 | | 2 | 8 | | 7 | |
| | 2 | | 9 | | | 4 | 8 | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 3 | 7 | 9 | 2 | 8 | 4 | 5 |
| 8 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 3 | 1 | 7 |
| 4 | 7 | 5 | 3 | 8 | 1 | 2 | 9 | 6 |
| 9 | 2 | 4 | 5 | 3 | 7 | 6 | 8 | 1 |
| 7 | 8 | 6 | 2 | 1 | 4 | 5 | 3 | 9 |
| 5 | 3 | 1 | 8 | 6 | 9 | 4 | 7 | 2 |
| 1 | 4 | 8 | 9 | 5 | 6 | 7 | 2 | 3 |
| 2 | 5 | 9 | 4 | 7 | 3 | 1 | 6 | 8 |
| 3 | 6 | 7 | 1 | 2 | 8 | 9 | 5 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### राष्ट्रीय

- २००६ – ‘लाभाचे पद’ विधेयकावर संसदेने शिक्कामोर्तब केले.

### आंतरराष्ट्रीय

- १५९० – डेन्मार्कची ॲन स्कॉटलंडच्या राणीपदी.
- १७९२ – न्यू यॉर्क शेरबाजाराची स्थापना.

### जन्म

- ११५५ – जियेन, जपानी कवीचा जन्म.
- १८६८ – होरेस एल्गिन डॉज, अमेरिकन उद्योगपतीचा जन्म.
- १८८६ – आल्फोन्सो तेरावा, स्पेनचा राजाचा जन्म.
- १८८८ – टिच फ्रीमन, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९४५ – भागवत चंद्रशेखर, भारतीय क्रिकेटपटूचा जन्म.
- १९४७ – जॉन ट्रायकोस, झिम्बाब्वेचा क्रिकेटपटूचा जन्म.
- १९६९ – उजेश रणछोड, झिम्बाब्वेचा क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- १३३६ – गो–फुशिमी, जपानी स्राटचे निधन.
- १७२७ – कॅथेरिन पहिली, रशियाची साम्राज्ञीचे निधन.
- १८८६ – जॉन डियर, अमेरिकन उद्योगपतीचे निधन.
- १८४६ – बाळशास्त्री जांभेकर, मराठी वृत्तपत्र व्यवसायाचे जनक, दर्पणकारचे निधन.
- १९४७ – जॉर्ज विल्यम फोर्ब्स, न्यूझीलंडचा पंतप्रधानाचे निधन.
- १९७२ – रघुनाथ कृष्ण फडके, शिल्पकारचे निधन.
- २००४ – कमिला तय्यबजी, वकील, समाजसेविकाचे निधन.
- २००८ – प्रकाश देशमुख, मराठी वृत्तपत्रसृष्टीतील ज्येष्ठ पत्रकार यांचे निधन.

प्रतिवार्षीक पालन

जागतिक दूरसंचार दिन.

संविधान दिन – नॉर्वे.

## : SMS :

So what did we Learn from movie Ghajini?? Revenge? Naahh... Immortal Love? No, no. Chor yaar mein batata hoon, Ganji Mundi par bhi maang nikal sakti hai!!!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८ | २८.९ |
| अहमदनगर | ३७ | २५.९ |
| अकोला | ४३.४ | ३१.१ |
| अमरावती | ४२.६ | ३२.१ |
| बीड | ४६.७ | ३२.५ |
| भंडारा | ४५.३ | ३३.३ |
| बुलढाणा | ३९.८ | २८.१ |
| चंद्रपूर | ४६.४ | ३४.२ |
| चेन्नई | ४०.५ | ३१.८ |
| नवी दिल्ली | ४०.२ | ३०.७ |
| धुळे | ३९.४ | २८.६ |
| गोंदिया | ४५.९ | ३३.३ |
| जळगाव | ४३.७ | ३०.१ |
| कोल्हापूर | ३७ | २४.१ |
| लातूर | ३८ | २९.५ |
| मुंबई | ३९.७ | ३३.३ |
| नागपूर | ४३.६ | ३४.१ |
| नांदेड | ४१.८ | ३१.९ |
| नंदूरबार | ३६.९ | २८.९ |
| नाशिक | ३७.५ | २४.७ |
| पुणे | ३४.९ | २३.३ |
| पंढरपूर | ३७.७ | २८.६ |
| सातारा | ३७.२ | २०.६ |
| सांगली | ३६.९ | २५ |
| सोलापूर | ३७.७ | २९.१ |
| वर्धा | ४४.८ | ३५.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल. प्रवासाचे योग येतील. ताण–तणाव जाणवतील. थकवा जाणवेल.

**तूळ :** मुले मोठी असल्यास त्यांच्याशी मतभेदाची शक्यता आहे. गुंतवणुकीस दिवस चांगला आहे.

**वृषभ :** नातेवाईकांकडून फारशा अपेक्षा नकोत. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. उमेद वाढेल.

**वृश्चिक :** वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. कर्मचारी, नोकरांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाची आर्थिक कामे होतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मिथून :** कौटुंबिक जीवनात फारसे स्वास्थ्य लाभणार नाही. कुटुंबातील व्यक्तींच्या वागण्यामुळे मनाला वेदना होतील. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**धनू :** मित्रांचे विशेष सहकार्य लाभेल. वाहने सावकाश व काळजीपूर्वक चालवावीत. काही व्यक्तींबाबतीत राहत्या जागेचे प्रश्न उभे राहतील.

**कर्क :** आर्थिक लाभाच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. उधारी–उसनवारी वसूल होईल. मात्र आर्थिक क्षेत्रात धाडस नको. वैवाहिक सौख्य लाभेल.

**मकर :** अनेकांशी सुसंवाद साधाल. कामाचा ताण जाणवेल. उधारी–उसनवारी वसूल होईल. प्रवासाचे योग येतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल.


**सिंह :** विवाहेच्छूंचे विवाह जमतील. प्रकृतीकडे लक्ष ठेवावयास हवे. खर्च वाढणार आहेत. नोकरी व्यवसायात सुस्थिती राहील. अनेकांशी सुसंवाद साधाल.

**कुंभ :** तुमची लोकप्रियता वाढेल. करार करण्यास दिवस चांगला आहे. नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. आर्थिक कामे सहजपणाने होणार आहेत.

**कन्या :** कलाकारांना व साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना सुसंधी लाभेल. आरोग्य उत्तम राहील. उत्साह वाढेल. महत्त्वाचे निर्णय नकोत.

**मीन :** उधारी उसनवारी वसूल करणेस हीच वेळ योग्य आहे. मनोबल व उत्साह वाढेल. मित्रांचे वागणे आपल्याला दु:ख देऊन जाईल. मनस्थिती द्विधा राहील.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९५१



**आडवे शब्द**

१. देव्हारा
५. गोदाम
८. विसराळू
१२. जंगलाचा राजा
१३. लोकसभा
१४. किंमत
१५. मृत्यू (हिंदी)
१६. मारुती, ---- बली
१८. तह, सामोपचाराने भांडण मिटणे
२०. श्रीकृष्णाचा पालक पिता
२२. जपानी चलन
२३. मोठी नदी
२४. परीक्षा, निवड
२६. लपविणे
२७. छाया
२८. आवडता, प्रिय
३०. धमनी
३१. ठिकाण, स्थान
३३. निष्णात, वाकबगार
३५. सापाची एक जात
३६. युद्धाची गाणी
३९. पुरुष, शूर पुरुष
४०. तरुण, सैनिक
४१. बोलणे
४३. अंजन
४४. नवल वाटावे अशी कामगिरी
४५. वर्ष
४६. अटीची भाषा
४८. समीक्षक
४९. एक हजार किलो
५०. उचलण्यास अवघड
५१. नमुना
५३. सरसरीत
५४. नवरा (ग्रा.)
५६. तीव्र रेचक
५९. आश्वासन
६१. मिरवणूक
६२. अजाणता
६४. दमदाटी
६५. कमळ, हंस
६६. कचऱ्याची जागा
६८. उत्कर्षाचा काळ
७३. अट, शर्त
७४. पावसाची वाट पाहणारा पक्षी
७५. मनाचा ओढा
७६. फुलपाखराची प्रथमावस्था

**उभे शब्द**

१. देवकीचा पुत्र, श्रीकृष्ण
२. अरण्य
३. खानदान
४. मातीचा कण
५. पहिला ऋतू
६. विशेष
७. एखाद्याच्या वतीने बोलणे
९. अखंड
१०. भोळा, भाबडा
११. घट्टच्या विरुद्ध
१४. विहिरीतून बैलाच्या सहाय्याने पाणी काढण्याचे साधन
१५. गप्प राहणे
१७. अनेक रंगाचे
१९. कंबरभोवतीचा चांदीचा दागिना
२१. मजबूत, टिकाऊ, जाड
२२. राबता ये–जा
२३. जाण्या–वागण्यात अनुभवाला येणाऱ्या नऊ भावना
२४. हालचालीवरील नजर
२९. अस्थिर, हलणारे
३२. हवेतील थंडावा
३३. कट्टा, चबुतरा
३४. भूतकाळ
३५. हात आणि पंजा यांचा सांधा
३७. प्रवासातील टप्पा
३८. भेदक, पोळणारे
४०. वस्तू गोळा करणे
४२. पांढरपेशा, नोकरी करणारा
४५. वर्षानुवर्षे
४७. रुक्ष
४८अ. मनातील उलघाल
५२. लाजणारा
५३. गोलंदाजांना साथ न देणारी खेळट्टी
५४. मेघ, ढग, दाट
५५. उघडउघड, स्पष्टपणे
५७. प्रतिष्ठित
५८. पणजीचे राज्य
६०. अभाव, टंचाई
६१. अशिलाची बाजू मांडणारा
६२. प्रयत्न केले तर याचा नारायण होतो
६३. सकस, सत्ययुक्त
६५. तात्पर्य
६६. चषक
६७. झाडू
६९. शंकर
७०. बगळा
७१. नांगर
७२. उदर

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५० चे उत्तर

आडवे उत्तर १.नामकरण ४.रसा ६.परिमल ८.तंग १०.रसना ११.सक्तमजुरी १२.वक्ष १३.तसदी १६.क्षमाशील १८.सर २०.खानदान २२.भाक २३.रवळनाथ २४.सालस २६.दर २७.खर २९.महामाया ३०.अंगत पंगत ३३.दानत ३६.परवा ३८.कसकस ४१.कानशील ४४.नानक ४५.तव ४६.लाड ४७.जानवे ४८.वसवस ५०.महिमान ५१.नाव ५२.बाक ५४.लटकणे ५५.रटरट ५७.जट ५८.बालगीत ६०.रद ६२.कस ६४.कणीदार ६६.रन ६७.साफ ६८.आटपाटनगर ७०.मोकाट ७२.लोलक ७४.वाण ७५.वस्ताद ७६.वर्तन ७७.साव ७८.रमली ८०.रपेट ८१.लढाई ८२.ईर्ष्या ८३.वीतान

उभे उत्तर : १.नारळ २.मस ३.कनात ४.रक्तदान ५.साम ६.परीक्षक ७.लवलवणे ९.गजरथ १४.सखा १५.दीनदयाळ १७.शीर १८.सनातन १९.कलम २१.दार २२.भारत २५.सहाय्यक २७.खग २८.अंग ३०.अंजन ३१.पंगू ३२.तपन ३३.दावा ३४.तपोवन ३५.नकलाकार ३७.रकम ३९.सड ४०.सजावट ४१.कावेबाज ४२.शीव ४३.लसलस ४४.नासकवणी ४५.तमासगीर ४९.वट ५१.नारद ५३.कटकट ५६.टरफल ५८.बारका ५९.तनमनधन ६१.नटवा ६३.सनगर ६४.करवली ६५.दामोदर ६७.सालोसाल ६९.पाणपोई ७१.टवटवी ७३.कसाई ७९.मठ्ठा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सेवा-साधना कृतज्ञता सोहळा

पुणे (दैनिक संध्या) : 'द करेज टू बी ह्यूमन' या अत्यंत प्रेरणादायी कार्यक्रमात सूत्रसंचालन करण्याची संधी मिळाली, हा अनुभव माझ्यासाठी खरोखरच समृद्ध करणारा ठरला. महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त मा. श्री सचिंद्रप्रताप सिंह यांच्या हस्ते सन्मानित होण्याचा बहुमान लाभला. मा. डॉ. विकास आमटे, मा. सौ. पल्लवी आमटे, मा. श्री एकनाथ डवले, मा. श्री सुनंदन लेले यांच्या उपस्थितीत मिळालेला हा सन्मान निश्चितच पुढील कामासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारा आहे. या निमित्ताने आनंदवनाचा विचार, तिथलं कार्य आणि सेवाव्रतींचं आयुष्य अधिक जवळून अनुभवता आले.




### धानोरीच्या शिक्षकाचा राज्यभर गौरव

पुणे (दैनिक संध्या) : सिद्धार्थ शिक्षण संस्था संचालित मातोश्री गिरीजाबाई पाटील प्राथमिक मराठी शाळा येथील मुख्याध्यापक व शिक्षक काँग्रेस वडगांवशेरीचे अध्यक्ष श्री. विजय रुपलाल श्रीवास्तव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. प्राईम टायकून मीडिया यांच्या वतीने कोथरूड येथील एम.ई.एस. ऑडिटोरियम येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राईम टायकून मीडियाचे सीईओ निलेश साबे, बाबासाहेब दिघे, नवनाथशेठ येवले तसेच जयश्री तायडे यांच्या हस्ते श्रीवास्तव यांचा गौरव करण्यात आला. श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजविणे, शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करणे तसेच पालक-शाळा समन्वय वाढविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने विविध उपक्रमांत उल्लेखनीय यश मिळविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील, उपाध्यक्ष अनुराग पाटील, संस्थापिका व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या पाटील, शिक्षक काँग्रेस राज्य उपाध्यक्ष श्री. सचिन दुर्गाडे व शिक्षक पुणे शहर अध्यक्ष श्री. धोंडिबा तरटे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्रीवास्तव यांचे अभिनंदन केले.

### कात्रज कोंढवा येथील भुसंपादन चालू असलेल्या ठिकाणी मंजुषा नागपुरे यांची भेट



पुणे (दैनिक संध्या) : कात्रज कोंढवा येथील भुसंपादन चालू असलेल्या ठिकाणी, मा. महापौर मंजुषाताई नागपुरे, व मा. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जागा पाहणी करून आढावा घेतला. मौजे कात्रज व मौजे कोंढवा येथील कात्रज चौक ते पिसोळीपर्यंत ८४ मीटर विकास योजना रस्त्यापैकी ५० मीटर विकास योजना रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही शासनामार्फत सुरू होती. दिनांक २७.०४.२०२६ रोजी सुमारे ४१,००० चौ. मी. क्षेत्राचा निवाडा विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १५ पुणे यांचे मार्फत जाहीर झालेला आहे.पुणे महानगरपालिकेने प्रस्तुत भूसंपादनाकरिता सुमारे १९७ कोटी रुपये शासनाकडे जमा केलेली आहे. तदनंतर निवाड्याची व ताबेबाबत पंधरा दिवसांची नोटीस देऊन, दिनांक १४.०५.२०२६ पासून प्रत्यक्ष ताबे घेण्यास सुरुवात केलेली आहे. दिनांक १४.०५.२०२६ व दिनांक १५.०५.२०२६ या दोन दिवसांमध्ये एकूण १०९ मिळकतींपैकी ४८ मिळकती ताब्यात घेण्यात आलेले असून जवळपास २५००० चौ. मी. क्षेत्र पुणे मनपाच्या ताब्यात आलेले आहे. NHAI मार्फत चालू असलेले कात्रज उड्डाणपूल उतरण्यासाठी आवश्यक असलेली जागा आज ताब्यात घेण्यात आलेली असून सदर ठिकाणी पथ विभागामार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. यामुळे या उड्डाणपूलाचे काम पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. याप्रसंगी मा. आमदार योगेश टिळेकर, सभागृह नेते श्री. गणेश बिडकर, प्रभाग समिती अध्यक्ष रंजनाताई टिळेकर, नगरसेविका अर्चना जगताप, पुजाताई कदम, मा.अति.महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे, पथ विभागाचे अधिक्षक अभियंता अजित बांबळे, भुसंपादन अधिकारी श्वेता दारुणकर व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### 'समर' म्हणून दमदार प्रवेशासह 'वसुधा' मालिकेत नवीन नाट्यमय वळण

पुणे (दैनिक संध्या) : या आठवड्यात मोठा बदल पाहायला मिळत असून झी टीव्हीवरील 'वसुधा' या मालिकेने टीआरपीच्या यादीत प्रथम स्थान पटकावले आहे. पुन्हा टॉपवर आल्यामुळे प्रेक्षकांसाठी ही मालिका अधिक रंजक बनवण्यावर वाहिनीचा भर आहे. सुरुवातीपासूनच मजेशीर घडामोडी आणि अनपेक्षित वळणांमुळे या मालिकेने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. भावनिक कथानक आणि वसुधा (प्रिया ठाकूर) व देव (अभिषेक शर्मा) यांच्या आयुष्य प्रवासामुळे ही मालिका प्रेक्षकांची आवडती बनली आहे. आता या कथानकात आणखी एक रोमांचक वळण येणार आहे. कथेत नवीन नाट्य आणि गूढपणा निर्माण करत अभिनेता परिचय शर्मा 'समर' या महत्त्वाच्या भूमिकेत मालिकेत प्रवेश करत आहे. समरचा प्रवेश कथानकाच्या अतिशय महत्त्वाच्या टप्प्यावर होत आहे, जिथे आधीच नातेसंबंधांची कसोटी लागलेली आहे आणि अनेक गुपिते उघड होऊ लागली आहेत. त्याच्या खऱ्या उद्देशाबद्दल अद्याप फार काही स्पष्ट झाले नसले तरी समर हा निष्ठा आणि डावपेच यांच्यातील पुसट रेषा सावधपणे सांभाळणारी व्यक्तिरेखा आहे. त्यामुळे त्याची उपस्थिती रंजक आणि अनपेक्षित ठरणार आहे. चौहान कुटुंबासोबतचे त्याचे संबंध भावनिक उलथापालथ घडवून आणणार असून अनेक समीकरणे बदलणार आहेत आणि नवीन संघर्ष निर्माण होणार आहेत. समरभोवतीचे गूढ वातावरण हळूहळू उलगडत जाईल आणि तो देव व वसुधाच्या बाजूने उभा राहील की त्यांच्यासमोर नवीन आव्हान निर्माण करेल याबाबत प्रेक्षकांमधील उत्सुकता शिगेला पोहोचेल. मालिकेतील आपल्या प्रवेशाबद्दल बोलताना परिचय शर्मा म्हणाला, "चालू असलेल्या प्रोजेक्टमध्ये नवीन कलाकार म्हणून पहिला दिवस कोणासाठीही थोडा कठीण असतो कारण सगळेचजण तुमचे मूल्यमापन करत असतात. मात्र 'वसुधा'च्या सेटवर माझा अनुभव अगदी वेगळाच होता. इथली माणसे खूपच चांगली आहेत.

# विद्यार्थी सहायक समितीमध्ये कला, संस्कार व सर्जनशीलतेचा संगम

## पद्मश्री प्रतापराव पवार यांचे प्रतिपादन; विद्यार्थी सहायक समितीमध्ये कलादालनाचे उद्‌घाटन

पुणे (दै. संध्या)




"चित्रकला आणि शिल्पकला या भारतीय संस्कृतीच्या वैभवशाली परंपरेचे प्रतीक असून, त्या देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा महत्त्वपूर्ण ठेवा आहेत. कल्पकता, संयम, एकाग्रता आणि समर्पण भाव तुमच्यातील कलाकार अधिक समृद्ध करतो," असे प्रतिपादन ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांनी केले. शिल्पकलेचा वारसा सांगणाऱ्या खटावकरांच्या तीन पिढ्यांच्या प्रवास विवेक खटावकर यांनी उलगडला.

विद्यार्थी सहायक समितीच्या शिवाजी हौसिंग सोसायटीजवळील लजपतराय विद्यार्थी संकुलात नव्याने उभारण्यात आलेल्या कलादालनाचे उद्‌घाटन व कलाकार (आर्टिस्ट) माजी विद्यार्थी मेळाव्यात खटावकर बोलत होते. प्रसंगी ज्येष्ठ चित्रकार मिलिंद मुळीक, समितीचे अध्यक्ष पद्मश्री प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, चित्रकार अश्विनी पवार, हेमंत राजहंस, प्रज्ञा सातारकर, संयोजक व विद्यार्थी विकास केंद्राचे प्रभाकर पाटील, हनुमंता जगनगडा, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, सचिव मनीषा गोसावी आदी उपस्थित होते.

उद्‌घाटनानिमित्त भरविण्यात आलेल्या समितीमध्ये राहून कलाविषयक शिक्षण घेतलेल्या आजवरच्या माजी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाला, तसेच समितीच्या कलाकार माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रदर्शन उद्या (रविवार) सायंकाळी ८ वाजेपर्यंत सर्वांना पाहता येणार आहे. तसेच सायंकाळी ५.३० वाजता चित्रकार विलास कुलकर्णी यांच्या जलरंग प्रात्यक्षिकांची अनुभूती कलाप्रेमींना घेता येणार आहे.

विवेक खटावकर म्हणाले, "कोणतीही कला केवळ सौंदर्य अनुभवण्याचे साधन नसून, भारतीय संस्कृतीची ओळख जपणारी प्रभावी अभिव्यक्ती आहे. कला समाजाला संवेदनशील बनवते आणि पुढील पिढीपर्यंत संस्कार व परंपरा पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. प्रत्येक अनुभव, प्रत्येक कलाकृती आणि प्रत्येक संघर्ष कलाकाराला शिकवून जातो. कला ही आत्मशोध घेण्याची प्रक्रिया आहे. शिल्पकार आणि चित्रकार हे एका नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे आहेत. दोघांच्याही अभिव्यक्तीची माध्यमे वेगळी असली तरी भावना, संवेदना आणि सर्जनशीलतेचा आत्मा एकच असतो."

प्रतापराव पवार म्हणाले, "विद्यार्थ्यांनी केवळ करिअरच्या मागे न धावता आपल्या आयुष्यात विविध छंदही जोपासले पाहिजेत. कला, साहित्य, क्रीडा किंवा इतर सर्जनशील उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा देतात. कलादालनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळेल.

# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेवरून काँग्रेसचा निशाणा

पुणे (दै. संध्या)

■ सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीचे काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांच्याकडून स्वागत

मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवला आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने व्यक्त केलेल्या हरकती आणि टिप्पण्यांचे स्वागत करताना 'देशातील घटनात्मक लोकशाही मजबूत ठेवण्यासाठी न्यायपालिका आणि स्वतंत्र माध्यमांची निर्भीक भूमिका अत्यंत आवश्यक आहे.' असे तिवारी म्हणाले.



काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी स्थापन केलेल्या निवड समितीमध्ये पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश होता. मात्र, केंद्र सरकारने केलेल्या दुरुस्तीनंतर सरन्यायाधीशांना समितीतून वगळून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा समावेश करण्यात आला. हा बदल लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी केला.

हे दुरुस्ती विधेयक संसदेत मोठा गदारोळ आणि विरोधी खासदारांच्या निलंबनादरम्यान मंजूर करण्यात आले. काँग्रेस प्रवक्त्यांच्या मते, 'निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र घटनात्मक संस्थेची निष्पक्षता आणि स्वायत्तता कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.' मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करताना तिवारी म्हणाले की, निवडणूक आयोगाने सत्ताधारी पक्षापासून स्वतंत्र आणि निष्पक्षपणे काम केले पाहिजे, जेणेकरून जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास कायम राहील.

सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील टिप्पणीचा उल्लेख करताना ते म्हणाले की, 'हे समाधानाची बाब आहे की देशाची सर्वोच्च न्यायपालिका अजूनही संविधान आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी वचनबद्ध आहे.' हजारो स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि प्रदीर्घ संघर्षानंतर देशाला लोकशाही आणि संविधान मिळाले आहे. अशा परिस्थितीत, येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य, स्वातंत्र्य आणि लोकशाही हक्कांचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. न्यायपालिका आणि प्रसारमाध्यमांनी निर्भीक आणि निष्पक्ष भूमिका बजावली, तर ती देश आणि संविधानाप्रती असलेल्या त्यांच्या निष्ठेचे प्रतीक आहे, असेही तिवारी म्हणाले.

# अंदमानात मान्सून आला रे! केरळात २६ मेपर्यंत पोहोचणार

पुणे (दै. संध्या)

शेतकऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. आज अंदमान मध्ये मान्सून दाखल असून मागच्या वर्षी पेक्षा ६ दिवस अगोदरच अंदमान मध्ये मान्सून दाखल झाला असल्याची माहिती हवामान विभागाचे प्रमुख डॉ.एस.डी.सानप यांनी दिली.

याबाबत हवामान विभागाचे प्रमुख डॉ. सानप म्हणाले की, आज मान्सून अंदमानमध्ये दाखल झाला आहे. गेल्या २४ ते ४८ तासांपासून अंदमान मध्ये पाऊस पडताना पहायला मिळत आहे. मान्सूनचे वारे सक्रिय झाल्यामुळे मान्सून अंदमान मध्ये दाखल झाला असून केरळ मध्ये येत्या २६ जून पर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. त्यानंतर मान्सून ६ जूनपर्यंत कोकण किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे. दरम्यान, पहिल्या टप्प्यातील अंदाजानुसार सरासरीच्या ९२ टक्के इतका यंदा पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावर्षी एल निनो' सक्रिय होत असल्यामुळे पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा ८ टक्क्यांनी कमी राहू शकते असेही डॉ. सानप यावेळी म्हणाले. सध्या उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत उष्णतेची तीव्र लाट पाहायला मिळत आहे. अकोला, जळगाव आणि नंदुरबार यांसारख्या शहरांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. मात्र येत्या दोन दिवसांत तापमानात घट होणार.

# रक्तदाबाचे निदान झालेल्या लोकांची संख्या शांतपणे वाढतेय

पुणे (दै. संध्या)

उच्च रक्तदाब किंवा उच्च रक्तदाबाचे निदान झालेल्या लोकांची संख्या भारतात शांतपणे वाढत आहे. हा यापुढे फक्त वृद्ध प्रौढांना प्रभावित करणारा आजार नाही. धक्कादायक म्हणजे, डॉक्टर आता अधिक तरुण लोक, विशेषत: किशोरवयीन, उच्च रक्तदाब असलेल्या त्यांच्या दवाखान्यात फिरताना पाहत आहेत. भारतातील किशोरवयीन आणि तरुण प्रौढांना नियमितपणासह उच्च रक्तदाबाचे निदान केले जात आहे ही खरोखरच चिंताजनक प्रवृत्ती आहे.

या वर्षीच्या जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त, आरोग्यसेवा तज्ञ तरुण लोकांमध्ये रक्तदाब वाढल्याबद्दल धोक्याची घंटा वाजवत आहेत, ज्यांपैकी अनेकांना त्यांच्या स्थितीबद्दल देखील माहिती नाही. किशोरवयीन आणि 20 चे दशक असा काळ आहे जेव्हा बहुतेक तरुण अजूनही निश्चिंत जीवन जगतात, बाहेर जेवतात, अभ्यास करण्यासाठी आणि गॅझेट वापरण्यासाठी मध्यरात्री तेल जाळतात आणि त्यांना योग्य आरोग्य शिस्त किंवा पुरेशी झोप नसते. त्यांच्यापैकी बहुतेक निरोगी दिसतात, म्हणूनच त्यांच्यात कोणतीही चिंताजनक लक्षणे दिसत नाहीत, उच्च रक्तदाबाच्या टॅगला 'सायलेंट किलर' असल्याचा विश्वास दिला जातो. अनुवांशिक स्वभावाव्यतिरिक्त, मुख्य दोषी आधुनिक जीवनशैलीच्या सवयी आहेत. रोगाच्या ओझ्यामध्ये योगदान देणारी एक प्रमुख चिंता ही आहे की बर्याच तरुणांना असे वाटते की ते जीवनशैलीशी संबंधित आजार होण्यासाठी "खूप तरुण" आहेत. परिणामी, ते अनेकदा नियमित आरोग्य तपासणी आणि रक्तदाब निरीक्षण वगळतात. आज किशोरवयीन मुलांवर शाळा आणि सोशल मीडियाचा खूप दबाव आहे. जीवनशैलीच्या निवडीसह ते एकत्र करा आणि ते लवकर उच्च रक्तदाबासाठी योग्य वादळ तयार करते.

# हवेली तहसील येथे मनरेगा कामगारांचे तीव्र आंदोलन

## पुणे जिल्हा ग्रामीण इंटकचे अध्यक्ष विजयदादा जाधव यांचा सक्रिय सहभाग

पुणे (दै. संध्या)

अखिल भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटक यांच्या केंद्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५ मे २०२६ रोजी पुकारण्यात आलेल्या अखिल भारतीय मनरेगा कामगार संपास महाराष्ट्र राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटकचे प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली हवेली तहसील कार्यालय येथे जोरदार समर्थन देण्यात आले. मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात शेकडो मनरेगा कामगार, शेतमजूर, ग्रामीण कामगार, कष्टकरी व शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. आंदोलनात पुणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटकचे अध्यक्ष विजयदादा जाधव यांनीही सक्रिय सहभाग घेत कामगारांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडली. मनरेगा योजना अधिक मजबूत



करणे, ग्रामीण गरीबांना रोजगाराचा कायदेशीर हक्क मिळवून देणे तसेच कामगारांवरील अन्यायकारक धोरणांचा निषेध करण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी हवेली तहसील परिसरात जोरदार घोषणाबाजी केली. संपूर्ण परिसर कामगारांच्या घोषणांनी दणाणून गेला होता. यावेळी आंदोलनकर्त्यांच्या वतीने तहसीलदार हवेली यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदनामध्ये मनरेगा योजना कमकुवत करणारे धोरण तात्काळ मागे घेणे, प्रत्येक कुटुंबाला किमान २०० दिवस रोजगार उपलब्ध करून देणे, मनरेगा कामगारांना प्रतिदिन किमान ₹७०० वेतन देणे, चेहरा ओळख आधारित उपस्थिती प्रणाली रद्द करणे तसेच ग्रामसभांना अधिक अधिकार देण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी बोलताना मा. डॉ. कैलास भाऊ कदम यांनी शासनाने मनरेगा कामगार, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा दिला. तसेच विजयदादा जाधव यांनी पुणे जिल्हा ग्रामीण भागातील कामगार, शेतकरी व शेतमजुरांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटक सातत्याने संघर्ष करत राहील असे स्पष्ट केले. या आंदोलनात पुणे जिल्हा कार्याध्यक्ष शंकर जाधव, सरचिटणीस गोविंदराव अटक, निलेश गजरमल, पोपटराव चौगुले, प्रकाश सावंत, मोहन निंबाळकर, दगडू पवार, राणू शिंदे, शिवाजी चव्हाण, पवन शेगर, सातपुते मॅडम, पठाण मॅडम, पुणे बँक सहकारी कर्मचारी संघटनेचे मंगेश पवार तसेच पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लिमिटेड पीएमटी कामगार संघ पुणेचे अध्यक्ष राजेंद्र अनंतराव खराडे हेही प्रमुख उपस्थित होते. तसेच इंटकचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, मनरेगा कामगार, शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पुण्यातील ईएसआय हॉस्पिटल सर्व सुविधांसह त्वरित सुरू करावे

**भारतीय मजदूर संघाची मागणी**

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी कर्मचारी राज्य विमा योजना (ESI) अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भारतीय मजदूर संघाने केले असून, पुण्यातील बिबवेवाडी येथील ईएसआय हॉस्पिटल सर्व अत्याधुनिक सुविधांसह त्वरित पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

दि. 12 मे 2026 रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा. कामगार मंत्री तसेच मा. आरोग्य मंत्री यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्यातील ईएसआय योजनेंतर्गत विविध प्रलंबित प्रश्न, रुग्णालयीन सुविधा, कामगारांच्या आरोग्यविषयक अडचणी, योजनांची अंमलबजावणी, लाभार्थ्यांचे कव्हरेज आणि सेवा विस्तार याबाबत सविस्तर बैठक पार पडली होती. या बैठकीमध्ये राज्यातील ईएसआय सेवा अधिक सक्षम, परिणामकारक आणि कामगाराभिमुख करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

त्यानंतर दि. 15 मे 2026 रोजी कर्मचारी राज्य विमा महामंडळ, बिबवेवाडी, पुणे येथे ईएसआय हॉस्पिटलच्या कामकाजाचा विशेष आढावा घेण्यात आला. यावेळी ईएसआय हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. प्रदीप गायकवाड यांनी जुलै 2026 पूर्वी सर्व आधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असे 220 बेडचे ईएसआय हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने रुग्णांच्या सेवेत दाखल करण्यात येईल, अशी माहिती दिली.

तसेच पुणे जिल्ह्यातील बारामती येथे 100 बेडचे, सातारा जिल्ह्यातील शिरवळ (ता. खंडाळा) येथे 100 बेडचे तसेच चाकण एमआयडीसी (ता. खेड) येथे 300 बेड क्षमतेचे अत्याधुनिक



ईएसआय हॉस्पिटल लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. औद्योगिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यरत असलेल्या कामगारांसाठी ही रुग्णालये अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

भारतीय मजदूर संघाने या सर्व प्रस्तावित व प्रगतिपथावरील ईएसआय हॉस्पिटल्सचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून ती त्वरित पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावीत, अशी ठाम मागणी केली आहे. राज्यातील लाखो कामगार व त्यांच्या कुटुंबियांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सामाजिक जबाबदारी असल्याचे संघटनेने नमूद केले.

यासोबतच ईएसआय योजनेंतर्गत विविध प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. योजनांचे लाभ अधिकाधिक सभासद व लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी राज्यभर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेषतः असंघटित, ठेका व औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना ईएसआय योजनांची माहिती, नोंदणी प्रक्रिया, वैद्यकीय सुविधा आणि लाभांविषयी जागरूक करण्यावर भर देण्यात येणार आहे.

भारतीय मजदूर संघाने बैठकीमध्ये 40 वर्षांवरील ईएसआय सभासदांसाठी नियमित मेडिकल चेकअप, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी, जीवनशैलीशी संबंधित आजारांचे निदान, मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, कर्करोगपूर्व लक्षणे, पौष्टिक कमतरता यांचे वेळेत निदान तसेच आरोग्य जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. वाढत्या औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कामगारांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य व्यवस्थेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही संघटनेने स्पष्ट केले.

या बैठकीमध्ये भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे उपस्थित होते. तसेच डीन डॉ. प्रदीप गायकवाड, चिकित्सा अधीक्षक डॉ. विभूती आंबवडे, सहाय्यक चिकित्सा अधीक्षक डॉ. निना, उपनिदेशक अनंत कुमार वर्मा, प्रतिनिधी भानुदास रसाळ, सहाय्यक अभियंता श्री. लाल, सहाय्यक नर्सिंग अधीक्षक श्रीमती देशमुख तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस उपस्थित भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण तसेच अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी राज्यातील सर्व ईएसआय सभासदांनी योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा तसेच नियमित आरोग्य तपासणी करून स्वतःचे व कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पावसाळ्यापूर्वी पूरनियंत्रणासाठी ठोस कृती आराखड्याची मेधा कुलकर्णी यांची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : पावसाळा तोंडावर आलेला असताना पुणे शहरातील पूरनियंत्रणासाठी प्रशासनाने नेमके कोणते नियोजन केले आहे, याची स्पष्टता आवश्यक आहे. मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाच्या सुरू असलेल्या कामांमुळे नदीची वहनक्षमता कमी होत असून, त्यामुळे पुराचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकल्पामुळे अधिकृत सोसायट्या व घरांना फटका बसणार नाही, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घ्यावी, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केली. पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवारी पार पडली. या बैठकीत खासदार कुलकर्णी यांनी पुणे शहर व जिल्ह्यातील विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. नदीपात्रातील भरावामुळे पावसाळ्यात पाणी सोसायट्यांमध्ये शिरण्याची भीती व्यक्त करत, दरवर्षी पुराचा फटका बसणाऱ्या वसाहतींसाठी प्रशासनाने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. नसरापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळा, सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके तसेच गर्दीच्या भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली. सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपीचा शोध लागल्याचे उदाहरण समोर आले असल्याने महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी ही यंत्रणा प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा आणि अन्य मूलभूत सोयींसाठी निधी वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. 'जेंडर बजेट' अंतर्गत महिला व विद्यार्थिनींसाठीच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांमध्ये वाढ करण्याची मागणीही त्यांनी केली. पुणे शहर व ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील अतिक्रमणांचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. दर्गे, मजारी तसेच अन्य धार्मिक अतिक्रमणे आणि वक्फ नोंदींच्या संदर्भातील प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

### सील केलेली जागा बेकायदेशीर ताब्यात घेतल्यामुळे एकावर गुन्हा दाखल

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : थकीत कर्ज वसुलीसाठी सील करण्यात आलेल्या मिळकतीचे सील व कुलुप तोडून मिळकतीमध्ये अनाधिकाराने प्रवेश केला म्हणून एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी येथील लोणी काळभोर येथील अभिनव चेतना नागरी सहकारी पतसंस्थेच्या व्यवस्थापिका प्रतिभा राहुल तुपे (वय ४६, रा. मल्हार बंगला, डीपी रोड, साधुनाना तुपे वस्ती, साडेसतरा नळी, हडपसर, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून डॅनिअल दिनकर पवार (रा. होरेबनगर, लोणी स्टेशन, कदमवाकवस्ती, एमआयटी कॉलेज जवळ, ता. हवेली) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस दिलेल्या माहितीनुसार पवार यांनी ३ जुलै २०१५ रोजी कदमवाकवस्ती येथील त्यांची व संमती देणार जोत्स्ना डॅनिअल पवार यांचे मालकीचे गट नंबर ५६९ पैकी यांचे हिस्स्याचे क्षेत्र ३.२७ आर. व त्यावरील वॉर्ड क्रमांक ३ मधील मिळकत नंबर ३/०११३८ च्या तारणावर घर दुरुस्ती, घर बांधणीसाठी पंचवीस लाख रुपये स्थावर तारण कर्ज घेतले आहे. तसेच सदर मिळकतीवर दिंनाक २१ एप्रिल रोजी त्यांचे कटुंबिय जोत्स्ना पवार व रिबेका डॅनिअल साळवी यांचे नावावर प्रत्येकी पंचवीस लाख रुपये असे एकूण पंच्याहत्तर लाख रुपये स्थावर तारण कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची थकबाकी झाल्यानंतर कर्जदार व जामिनदार यांना वेळोवेळी सांगून, लेखी नोटीसा देऊन देखील कर्जदार यांनी थकित रक्कमेचा भरणा केला नाही. यानंतर संस्थेने कर्ज वसुलीसाठी सदर कर्जदार व जामिनदार यांचेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कायदा कलमान्वये कायदेशीर कारवाई करुन पोलीस बंदोबस्तामध्ये २१ जुलै २०२५ रोजी या मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला व सदर मिळकतीला कुलुप लावून सील केली होती. मात्र, ३० जुलै २०२५ला पवार यांनी संस्थेची कोणतीही परवानगी न घेता घराचे सील आणि कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे उघड झाले.



### उत्तरेश्वर मंदिर रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाचा शुभारंभ

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर शहरातील प्राचीन उत्तरेश्वर मंदिर रस्त्याच्या संरक्षक भिंतीच्या कामाचा शुभारंभ जुन्नर नगरीच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता मधुकर काजळे यांच्या हस्ते, नगर परिषेदचे मुख्याधिकारी चरण कोल्हे, बांधकाम विभाग प्रमुख राऊत, नगरसेवक आकीफ इनामदार, जन सेवक मधुकर काजळे, उत्तरेश्वर मंदिराचे पदाधिकारी, विश्वस्थ,व नागरिक यांचे उपस्थितत करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा सुजाता काजले यांनी पावसाळ्यापूर्वी सर्व काम गुणवत्तापूर्वक, तातडीने पूर्ण करण्याविषयी संबंधित ठेकेदारालाच सूचना दिल्या.

### 'महालक्ष्मी सरस 2026' : ग्रामीण महाराष्ट्राला जागतिक व्यासपीठ देणारं भव्य प्रदर्शन



मुंबई (दैनिक संध्या) : बीकेसी येथे सुरू असलेलं 'महालक्ष्मी सरस २०२६' यंदा आपल्या भव्य उभारणी, आधुनिक सादरीकरण आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आलं आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत 'उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान'च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाची संकल्पना आणि डिझाईनबाबत दीपाली डिझाईन्सचे सर्वेसर्वा विनय मित्तल यांनी माहिती दिली. यंदाच्या प्रदर्शनात ४० मीटर x ७ मीटरची विशाल एलईडी ॲनामॉर्फिक स्क्रीन, आकर्षक लाईटिंग, वातानुकूलित फूड कोर्ट आणि ६० हून अधिक कंटेनर्सच्या माध्यमातून उभारलेला भव्य सेट हे प्रमुख आकर्षण ठरत आहेत. जवळपास १५ हजार किलो वजनाच्या कंटेनर्सचा वापर करून साकारलेला हा सेट ग्रामीण महिलांच्या उत्पादनांचा "लोकल टू ग्लोबल" प्रवास दर्शवतो. संपूर्ण उभारणीसाठी १ लाख १८ हजारांहून अधिक मनुष्यतास खर्च करण्यात आले असून, महाराष्ट्रातील कलाकारांनी हजारो तास मेहनत घेत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे.

# मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील झोपडपट्टीधारकांसाठी सुवर्णसंधी

मुंबई (दै. संध्या) :

- खासदार रवींद्र वायकर यांच्या प्रयत्नांनी आरेमध्ये एस.आर.ए प्रश्नी 'जनता दरबार'चे आयोजन
- युनिट क्रमांक ५, आरे मार्केट, पंचवटी हॉटेल समोर, गोरेगाव (पूर्व) येथे सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत



मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या वर्सोवा, अंधेरी (पूर्व व पश्चिम), गोरेगाव (पूर्व व पश्चिम), जोगेश्वरी (पूर्व व पश्चिम), दिंडोशी (पूर्व व पश्चिम), मालाड (पूर्व व पश्चिम) येथील झोपडपट्टीधारकांसाठी या लोकसभेचे खासदार रविंद्र वायकर यांनी सुवर्णसंधी प्राप्त करून दिली आहे. झोपडपट्टी धारकांचा एस.आर.ए च्या माध्यामातून पुनर्विकास करताना निर्माण होणाऱ्या शंकांचे समाधान करण्यासाठी रविवार १७ मे रोजी एस.आर.ए अधिकारी यांच्या उपस्थितीत 'जनता दरबार'चे आयोजन केले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या सहकार्याने झोपडीधारकांचे जिवनमान उंचवण्यासाठी ह्या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसभा क्षेत्रातील विविध भागांमध्ये एस.आर.ए प्रकल्प राबवताना तेथील जनतेच्या मनातील अनेक शंका निर्माण होतात. परंतु त्यांच्या शंकांचे समाधान योग्यरीत्या करण्यात येत नाही. त्यामुळे प्रकल्प राबवताना अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अनेक प्रकल्प अर्धवट स्थितीत बंद करण्यात येतात. तर अनेक प्रकल्प अनेक वर्ष बंद राहतात. यात या प्रकल्पातील रहिवाशी भरडले जातात. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील वर्सोवा, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, दिंडोशी, मालाड या विधानसभा क्षेत्रातील अनेक झोपडपट्टी प्रकल्पधारकांना हि समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. या झोपडीधारकांना पुनर्विकास करताना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांचे उत्तर अधिकारी देणार असून त्यांच्या शंकांचे समाधानही या जनता दरबारात करण्यात येणार आहे. यात एस.आर.ए चे आर.बी. मिटकर (उपमुख्य अभियंता), वैशाली लंभाते (उपजिल्हाधिकारी), स्वप्नील तांगडे (सक्षम अधिकारी), सचिन गिरी (सक्षम अधिकारी), प्रशांत सूर्यवंशी (सक्षम अधिकारी), राजाराम पाटील (सक्षम अधिकारी), हनुमंत मासाळ (सक्षम अधिकारी), दिनेश महाजन (सक्षम अधिकारी), स्वप्ना देशपांडे (मिळकत व्यवस्थापक), संध्या बावनकुळे (सहाय्यक निबंधक (सहकार) पूर्व व पश्चिम उपनगरे) उपस्थित राहणार आहेत. रविवारी सकाळी १०.३० ते दुपारी १ या कालावधीत ह्याचे आयोजन करण्यात आले असून याचा लोकसभा क्षेत्रातील जास्तीत जास्त झोपडीधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

#### एस.आर.ए जनता दरबार

१) झोपडीधारकांची बायोमेट्रिक विषयक समस्यांचे निराकरण.
२) प्रलंबित भाडे तक्रारी निकाली काढून भाडे प्रदान.
३) झोपडीधारकांची पात्रता विषयी तक्रारींचे निवारण.
४) सदनिका वाटपाची प्रकरणे निकाली काढणे.
५) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची सद्यस्थितीची माहिती देणे व तक्रारींचे निवारण करणे.
६) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.पु) आधी १९७१ मधील कलम ३३ खालील कार्यवाही करणे.

### कान्स चित्रपट महोत्सवात " जीव-द क्रिअचर " या चित्रपटाची वर्णी लागली

नवी दिल्ली (दै. संध्या) :



यंदाच्या कान्स चित्रपट महोत्सवात " जीव-द क्रिअचर " या चित्रपटाची वर्णी लागली आहे. हा चित्रपट १६ मे २०२६ रोजी कान्स महोत्सवात दाखवण्यात येणार आहे. या महोत्सवात मार्श डू-फिल्म्स या विभागात महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्यावतीने "जीव" या चित्रपटाची निवड झाली आहे. चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रविंद्र जाधव यांनी केले असून ध्वनी संयोजन आणि पार्श्वसंगीत प्रशांत कांबळे यांनी केले आहे. जीव-द क्रिएचर हा सिनेमा कोकणी (आदिवासी) भाषेत असून लुप्त होत असलेल्या "पावरी" या वाद्याशी जोडला गेला आहे. आदिवासी संस्कृती, त्यांच्या चालीरीती यावर हा चित्रपट आधारित आहे. पिंपळनेर येथील आदिवासी पाड्यात चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून आदिवासी संस्कृती आणि आदिवासी संगीत याचा उत्तम मेळ चित्रपटात साधलेला आहे. पार्श्वसंगीत करताना प्रशांतने आदिवासी लोकांचे सण, त्यांची भाषा, भाषेतले विविध आवाज तसेच पावरी, थाळसर-बांगसर, ढोल अशा विविध वाद्यांचा वापर केला आहे. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे वातावरणातील बदल , सकाळ, दुपार संध्याकाळ यांच्या बदल आणि त्यानुसार ऐकू येणारे आवाज यावर जास्त काम करण्यात आले आहे. या चित्रपटासाठी प्रशांत कांबळे यांनी ध्वनी संयोजन, पुनर्ध्वनी मिश्रण, आणि पाश्वसंगीत अशी तिहेरी भूमिका निभावली आहे.

## पुणेच्या आशिष लिमये यांची पुन्हा दमदार कामगिरी

### वर्ल्ड गेम्स आणि आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी वैयक्तिक पात्रता

नवी दिल्ली (दै. संध्या) :



भारतीय अश्वक्रीडापटू आशिष लिमये यांनी पोलंडमधील सोपोट येथे आयोजित प्रतिष्ठित अश्वक्रीडा स्पर्धेत देशासाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी 'सीसीआय थ्री-एस' आणि 'सीसीआय फोर-एल' या दोन्ही गटांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

जगातील अव्वल अश्वस्वारांशी स्पर्धा करताना आशिष यांनी 'डी'अव्हिल ड्यु पिनिए' या घोड्यावर स्वार होत 'सीसीआय फोर-एल' गटात ११ स्पर्धकांमध्ये उल्लेखनीय स्थान मिळवले आणि वर्ल्ड गेम्ससाठी पात्रता मिळवली. तसेच, 'सीसीआय थ्री-एस' गटात ४४ स्पर्धकांमध्ये त्यांनी 'विली बी डन' या या घोड्यावर स्वार होत आशियाई क्रीडा स्पर्धांसाठीही यशस्वी पात्रता मिळवली.

या कामगिरीमुळे आशिष लिमये यांनी 'विली बी डन' या घोड्यावर स्वार होत 'सीसीआय थ्री-एस' गटात सप्टेंबर २०२६ मध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी वैयक्तिक पात्रता मिळवली आहे. तसेच, 'डी'अव्हिल ड्यु पिनिए' या दुसऱ्या घोड्यावर स्वार होत त्यांनी 'सीसीआय फोर-एल' गटात ऑगस्ट २०२६ मध्ये जर्मनीमध्ये होणाऱ्या वर्ल्ड इक्वेस्ट्रियन गेम्ससाठीही पात्रता मिळवली आहे.

आशिष लिमये यांच्या प्रवासाला आणि सातत्यपूर्ण यशाला 'एम्बसी इंटरनॅशनल रायडिंग स्कूल'चे (ईआयआरएस) मोलाचे पाठबळ लाभले आहे. भारतात जागतिक दर्जाचे अश्वक्रीडापटू घडवणे तसेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे यामध्ये या संस्थेची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

या यशाबद्दल बोलताना आशिष लिमये म्हणाले, "आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना वर्ल्ड गेम्स आणि आशियाई क्रीडा स्पर्धा या दोन्हीसाठी पात्रता मिळवणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. सोपोट येथे बलाढ्य आंतरराष्ट्रीय अश्वस्वारांविरुद्ध स्पर्धा करणे हा मोठा शिकण्याचा अनुभव होता. एम्बसी इंटरनॅशनल रायडिंग स्कूल, माझी टीम आणि या प्रवासावर विश्वास ठेवणारे या सर्वांकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल मी मनापासून आभारी आहे."

आशिष यांच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बोलताना 'एम्बसी इंटरनॅशनल रायडिंग स्कूल'च्या संचालिका सिल्वा स्टोराय म्हणाल्या, "सोपोटमधील आशिषच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे आंतरराष्ट्रीय अश्वक्रीडा क्षेत्रातील भारताची वाढती प्रगती दिसून येते. आशिष यांच्या या यशामुळे देशभरातील नवोदित अश्वस्वारांना प्रेरणा मिळणार असून, भारतीय अश्वक्रीडापटू आता जागतिक स्तरावर अधिक सक्षमपणे स्पर्धा करत असल्याचेही यातून अधोरेखित होते. तसेच सातत्यपूर्ण प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय अनुभव आणि संस्थात्मक पाठबळ यांचा जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यामध्ये किती मोठा प्रभाव पडतो, हेही या कामगिरीतून स्पष्ट होते."

## चाकणला १७ लक्ष लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे थाटात भूमिपूजन

चाकण (दै. संध्या) :

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजनेतून मंजूर असलेल्या चाकण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत प्रभाग क्रमांक सहा राणुबाई मळा येथे १७ लक्ष लिटर क्षमतेच्या उंच पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले. येथील सारा कस्तुरी सोसायटीच्या समोरील मोकळ्या जागेत ही भव्य पाण्याची टाकी उभारण्यात येणार असून, या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांच्या दीर्घकालीन पाणी समस्येवर मोठा दिलासा मिळणार आहे. वाढती लोकसंख्या व भविष्यातील गरज लक्षात घेऊन १७ लक्ष लिटर क्षमतेची टाकी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पाणी योजनेला महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली होती. त्यांच्या माध्यमातून चाकण शहरासाठी ही महत्त्वपूर्ण पाणीपुरवठा योजना साकार झाली असून, शहराच्या विकासात हा एक मोठा टप्पा मानला जात आहे. यावेळी नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेविका जयश्री नायकवाडी, रूपाली कांडगे, ॲड. वर्षा शेवकरी, पुनम शेवकरी, विजया तोडकर, स्वाती लेंडघर तसेच बांधकाम समितीचे सभापती रणजीत जरे, आरोग्य समितीचे सभापती मंगेश कांडगे, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, नगरसेवक हर्षद लेंडघर, विकास धाडगे, सागर बनकर, आकाश जाधव, अनिल लोहकरे, शशिकांत जाधव, विजया जाधव आदी उपस्थित होते.

सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना नियमित व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होणार असून, चाकण शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये ही एक महत्त्वाची बाब आहे.

> "चाकणला प्रभाग क्रमांक सहा मधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेष म्हणजे स्व.आ.सुरेशभाऊ गोरे यांनी चाकण शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून पाणी आणण्याकरिता विशेष प्रयत्न केले होते. त्यांच्या दूरदृष्टी आणि प्रयत्नांमुळेच आज हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार होत आहे."
> - मनीषा गोरे, नगराध्यक्षा, चाकण

### चीनकडून अमेरिकेचा टप्प्यात कार्यक्रम, ट्रम्प जिनपिंग यांना घाबरले

नवी दिल्ली (दै. संध्या) :

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प दोन दिवसांच्या चीनच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्याकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं होतं. कारण हा दौरा अशावेळी झाला की जेव्हा अमेरिका आणि इराणमधील संघर्ष शिगेला पोहोचला आहे. चीन हा इराणचा चांगला मित्र आहे. अमेरिका आणि इराण युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मूज बंद आहे, ज्यामुळे संपूर्ण जगावर मोठं ऊर्जा संकट निर्माण झालं आहे. याचा काही प्रमाणात चीनला देखील फटका बसला आहे. या युद्धाचा जागतिक आर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होणार असल्याचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे. अशा स्थितीमध्ये दोन बलाढ्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांची बैठक झाली. मात्र या बैठकीमधून डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती विशेष काही लागलं नाही. चीनसोबत कुठलाही करार न करताच ट्रम्प परतल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान या उलट या बैठकीमध्ये चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांनीच डोनाल्ड ट्रम्प यांना उघड-उघड धमकी दिल्याची माहिती देखील समोर आली आहे. तैवानच्या मुद्द्यावरून चीनने ट्रम्प यांना स्पष्ट संदेश दिला आहे. शी जिनपिंग यांनी ट्रम्प यांना स्पष्ट शब्दात सांगितलं आहे की, तैवानच्या प्रश्नामध्ये अमेरिकेनं हस्तक्षेप करू नये, अन्यथा याचे परिणाम खूप गंभीर होऊ शकतात.


**MAHAVITARAN** — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER Notice**

1) Tenders are invited from registered & reputed firms / companies / electrical contractor through e-Tendering For Tender **for Supply of Tinned Copper Fuse Wire 10/ 12 /16/14 SWG under Manchar Division.**

**Tender No: EE/MCR/ DO FUSE ELEMENT /T-11/2026-27**

**Tender Amt= 2 lakh**

All other details are available on tendering website. http://works.mahadiscom.in/eTender/etender.

**PRO No. PZ-048/26-27.**

**EXECUTIVE ENGINEER, MANCHAR**


### इंधन बचतीसाठी महावितरणचे एक पाऊल पुढे!

मुंबई : पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमिवर इंधन बचतीसाठी पेट्रोल व डिझेलऐवजी विद्युत वाहनांचा वापर करण्याचे आवाहन पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यास महावितरणने कृतीशिल प्रतिसाद दिला असून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्यासह सर्व संचालक आणि कार्यकारी संचालकांनी विद्युत वाहनांचा वापर सुरु केला आहे. दरम्यान सर्व संचालकांसाठी गुरूवारी (दि. १४) नवीन विद्युत वाहने उपलब्ध झाले असून या ईव्ही वाहनांचा वापर देखील सुरु करण्यात आला आहे.

### जाहीर नोटीस

मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआर 26/26 दिनांक:-11/5/2026

नोटीस

विदयानंद श्रीहरी गाढवे रा सावरगांव ता जुन्नर जि पुणे - अपिलार्थी

विरुध्द

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी - प्रतिवादी

ग्राम अधिकारी / मुख्याधिकारी ग्रामपंचायत सावरगाव

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्री विदयानंद श्रीहरी गाढवे रा सावरगांव ता जुन्नर जि पुणे यांनी आई नामे के हिराबाई श्रीहरी गाढवे यांचा मृत्यू दिनांक 30/06/1984 रोजी मोजे सावरगाव, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेले आहे. यांचा मृत्यू नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३ (३) प्रमाणे फौजदारी किरकोळ 26/26 दिनांक 6.2.2026 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 11/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना साबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषता जुन्नर ता जुन्नर जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

आमचे अशील नामे श्री. किसन भागुजी चिखले यांचे अस्सल खरेदीखत (दस्त क्रमांक ज.न.र ५६१/१९८८) गहाळ झाले आहे.

मिळकतीचे वर्णन :- तु पुणे, पो. तु. जुन्नर, ता. व. सं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी नगरपरिषद जुन्नर यांचे हद्दीतील

सिटी सर्वेन २२६५ व २२६६ वरील मिळकत यांसी चर्तु:सीमा

| सिटी सर्वे | क्षेत्र | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| २२६५ | २४३.२ | २२७३ | २२६३, २२६४ | बोळ | २२६७ |
| २२६५ | २०६.४ | २२७३ | २२६५ | बोळ | २२७२, २२६६ |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील झाडझाडोरा तरंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत,

सदर मालमत्ता आमचे अशीलानी श्रीमती. उषा मधुकर पाठक यांच्याकडून कायदेशीररित्या खरेदी केली होती. सदर खरेदीखत दिनांक १४/०५/२०२६ रोजी गहाळ / झाले असून, हरवलेल्या मालमत्तेचा नोंदणी क्र १३९/२०२६ अन्वे जुन्नर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून आमचे अशिलांनी खूप शोध घेऊनही सापडत नाही. सदरील मिळकत श्री. किसान भागुजी चिखले यांनी Truhome Finance Limited (Formely known as Shriram Housing Finance Ltd.) यांचेकडे गहाण ठेवणाचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून सदर मिळकत तबदील करण्याचा त्यांना अधिकार आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार, गहाण, बक्षीस, दान, अन्न, वस्त्र, पोटगी, वहिवाट वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी व तक्रार नोंदवावी. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

जुन्नर — येणेप्रमाणे जाहीर नोटीस

दि. १५/०५/२०२६

श्री. केतनकुमार अशोक पडवळ
ॲडव्होकेट
(शंकरपुरापेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि पुणे)

## घरयादी व घरगणना मोहिमेसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा

### पिंपरी चिंचवड महापालिकेचे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी, दि. १५ मे २०२६ : जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरात घरयादी व घरगणनेच्या प्रक्रियेला १६ मे २०२६ पासून अधिकृत सुरुवात होणार आहे. ही मोहीम १४ जून २०२६ पर्यंत राबविण्यात येणार असून, या कालावधीत नियुक्त प्रगणक घरोघरी भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करणार आहेत. प्रगणक आपल्या घरी भेट देत असताना नागरिकांनी त्यांना अचूक, संपूर्ण व योग्य माहिती देऊन सहकार्य करणे अत्यावश्यक आहे. तसेच, ज्यांनी स्व-नोंदणी केली आहे त्यांनी आपला स्व-गणना क्रमांक प्रगणकांना देणे आवश्यक आहे.

घरयादी व घरगणना ही जनगणनेची मूलभूत आणि अत्यंत महत्त्वाची पायरी असून, या प्रक्रियेत घरांची संख्या, कुटुंबातील सदस्यांची माहिती तसेच उपलब्ध मूलभूत सुविधांची नोंद केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकास आराखडे, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक कल्याण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करते.

त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे, असे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी सांगितले.

जनगणना ही देशाच्या विकासाची दिशा ठरवणारी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. अचूक माहितीच्या आधारेच शासनाला योग्य नियोजन करता येते आणि नागरिकांपर्यंत विकासाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवता येतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही आपली जबाबदारी समजून प्रामाणिक व अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

**— डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

जनगणेसाठी संकलित केली जाणारी सर्व माहिती ही पूर्णपणे गोपनीय राखली जाते आणि ती केवळ शासकीय नियोजनासाठीच वापरली जाते. नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता विश्वासाने आणि निःसंकोचपणे योग्य माहिती द्यावी. तुमचे सहकार्य हेच शहराच्या आणि देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरेल.

**— सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पवना धरणातून रात्रीतून 50 डंपर हायवा डंपरद्वारे मुरुम चोरी

■ मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांकडे कारवाईची मागणी : युवराज दाखले

पिंपरी (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत ५० पेक्षा अधिक हायवा डंपरद्वारे अवैध मुरूम व मातीचे उत्खनन सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी शिवशाही व्यापारी संघाचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी केली आहे. "पवना धरण हे लाखो नागरिकांची जीवनवाहिनी आहे. याच धरणाच्या काठावरून जेसीबी -पोकलेन लावून २०- ३० फूट खोल खड्डे खणून मुरूम चोरला जात आहे. विना नंबर प्लेटच्या हायवा ट्रक गेव्हाण खडक, चांदेवाडी, ठाकूरसाई, ब्राह्मोली, कोथुर्णे, शिवली मार्गे चांदखेडकडे जातात. स्थानिक महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे शक्य नाही," असा गंभीर आरोप युवराज दाखले यांनी केला. "मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी व महसूल मंत्री बावनकुळे साहेब, पवना वाचवा. ७ दिवसांत कारवाई न झाल्यास शिवशाही व्यापारी संघ, व शेतकरी मिळून मंत्रालयासमोर ठिय्या देऊ. मुरूम माफियांना मावळातून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही," असा सज्जड इशारा युवराज दाखले यांनी दिला आहे.

### शहर अभियंता पदावर स्थानिक व कार्यक्षम अभियंत्याची नियुक्ती करा : वाघेरे



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शहर अभियंता हे महत्त्वाचे पद गेल्या अडीच महिन्यांपासून रिक्त आहे. आपण आयुक्तपदी रुजू होऊन दोन महिने पूर्ण झाले असले तरी अद्याप शहराला कायमस्वरूपी शहर अभियंता मिळालेला नाही. त्यामुळे अनेक विकासकामांवर तसेच प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे, त्यामुळे त्वरित शहरअभियंता पदी नियुक्ती करावी,अशी मागणी पिंपरीतील माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील शैक्षणिक अर्हता असलेले अनुभवी कार्यक्षम स्थानिक अभियंत्यांची शहर अभियंता पदावर त्वरित नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे, शहरातील आमदार, खासदार, माजी पदाधिकारी किंवा इतर राजकीय हस्तक्षेपामुळे हे पद आतापर्यंत रिक्त राहिले असल्याची चर्चा शहरातील नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे कोणाच्याही दबावाला बळी न पडता, आवश्यक शैक्षणिक अर्हता व प्रशासकीय अनुभव असलेल्या स्थानिक अभियंत्यांची शहर अभियंता पदावर तातडीने नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पिंपरीतील माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश नानासाहेब वाघेरे यांनी आयुक्तांनाकडे केली आहे.

### पावसाळ्यापूर्वी शहरातील स्ट्रॉम वॉटर, ड्रेनेज लाईन व नाल्यांची तातडीने सफाई करा

पिंपरी (दैनिक संध्या) : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील स्ट्रॉम वॉटर लाईन, ड्रेनेज लाईन आणि नाल्यांची तातडीने सफाई करण्यात यावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल ऊर्फ नाना काटे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. नाना काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून शहरातील नाले, स्ट्रॉम वॉटर आणि ड्रेनेज लाईनची सफाई केली जाते. मात्र यंदा अद्यापही अनेक भागांमध्ये सफाई झालेली दिसून येत नाही. दरम्यान, हवामान विभागाने राज्यात अवकाळी पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. सफाईअभावी नाल्यांमध्ये व ड्रेनेज लाईनमध्ये कचरा साचून पावसाचे पाणी रस्त्यावर तुंबण्याची शक्यता आहे.

## शिवशाही व्यापारी संघ महिला आघाडी प्रदेश

# अध्यक्षापदी उषा कांबळे व उपाध्यक्षापदी महानंदा चव्हाण यांची नियुक्ती

**पिंपरी (दै. संध्या)**



राज्यव्यापी संघटना शिवशाही व्यापारी संघाच्या महिला आघाडी प्रदेश अध्यक्षापदी उषामाई भिमराव कांबळे व उपाध्यक्षापदी (प्रभारी) म्हणून महानंदाताई सोपान चव्हाण यांची नियुक्ती प्रदेश मुख्य सचिव कल्पना मोरे- दाखले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी आज जाहीर केली. यावेळी युवराज दाखले म्हणाले, "उषामाई कांबळे व महानंदाताई चव्हाण या सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असून महिला सक्षमीकरण, व्यापारी महिलांचे प्रश्न व हिंदू संस्कृती रक्षणासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवी व लढाऊ नेतृत्वाखाली महाराष्ट्रात प्रामुख्याने पिंपरी-चिंचवड शहरात महिला आघाडी अधिक बळकट होऊन घराघरात संघटनेचा विचार पोहोचवला जाईल." नवनियुक्त प्रभारी महीला आघाडी प्रदेश अध्यक्षा उषा माई भिमराव कांबळे व उपाध्यक्षा महानंदाताई सोपान चव्हाण यांनी नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले, "संस्थापक अध्यक्ष युवराज दादा यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला मी पूर्णपणे सार्थ ठरवेन. आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्य रत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे व इतर बहुजन महापुरुषांच्या विचाराने व युवराज दादांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील व शहरातील प्रत्येक प्रभागात महिला आघाडीची फळी उभी करणार आहे. महिला सुरक्षा, स्वसंरक्षण, स्वावलंबन व धर्मरक्षण या मुद्द्यांवर आम्ही प्राधान्याने काम करू." शहरातील प्रत्येक जिल्ह्यात व प्रभागात महिला संपर्क प्रमुख नेमणे , व्यापारी भगिनींच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र कक्ष सुरू करणे, लव्ह जिहाद जनजागृती मोहीम राबवणे ,महिलांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे ,महिला बचत गट व उद्योजकतेला चालना देणे

उषा कांबळे व महानंदा चव्हाण नियुक्तीने प्रदेश मुख्य सचिव कल्पना मोरे- दाखले यांचा नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरात संघटनेला नवी ऊर्जा मिळाली आहे. लवकरच शहराची संपूर्ण महिला कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल," असे युवराज दाखले यांनी शेवटी सांगितले.

## टाऊन हॉलला 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज' यांचे नाव..!

■ पिंपरी-चिंचवड महापालिका महासभेत उपसूचनेस मंजुरी

■ नगरसेवक कुंदन गायकवाड सूचक, निखिल बोऱ्हाडे अनुमोदक

**पिंपरी (दै. संध्या)**

टाळगाव चिखली येथील टाऊन हॉलला "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" असे नामकरण करण्याच्या उपसूचनेस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे वारकरी संप्रदायाच्या सांस्कृतिक वारशाला सन्मान मिळाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महापौर रवि लांडगे यांनी या उपसूचनेला मंजुरी दिली आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल उभारण्यात आला आहे. टाळगाव चिखली हे गाव संत परंपरेशी निगडित असून, या परिसरास जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीतील समता, मानवता आणि भक्तीभावाचा प्रभाव आजही परिसरातील सामाजिक व धार्मिक वातावरणात दिसून येतो. संत तुकोबांनी या गावात टाळ ठेवले होते. त्यामुळेच या गावाला "टाळगाव चिखली" हे नाव पडल्याची स्थानिकांमध्ये श्रद्धा आहे. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर टाऊन हॉलला संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली होती. महासभेत मंजूर झालेल्या या उपसूचनेनुसार, टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल आता "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" या नावाने ओळखला जाणार आहे. स्थानिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## वायसीएम मधील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावणार

### स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून रुग्णालयाची पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**



यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी आज रुग्णालयाचा सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करत त्रुटी दूर करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. अभिषेक बारणे यांनी रुग्णालयातील सर्व संबंधित विभाग प्रमुख आणि अधिकाऱ्यांच्या समवेत ४ थ्या मजल्यावरील वॉर्डची सविस्तर पाहणी केली. यावेळी रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेताना त्यांनी वॉर्डातील अत्यावश्यक सोयी, वैद्यकीय उपकरणांची स्थिती आणि लिफ्टच्या वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांची दखल घेतली. लिफ्ट दुरुस्तीबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता, याबाबत तातडीने कार्यवाही करून रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय टाळण्याचे आदेश त्यांनी दिले.

रुग्णालयावर वाढणारा रुग्णांचा भार विचारात घेता, परिसरातील मोकळ्या जागेचा प्रभावी वापर करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. या जागेत इमारतींचा विस्तार करून नवीन आरोग्य सेवा सुरू करण्याच्या शक्यता त्यांनी पडताळून पाहिल्या. रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी टॉयलेट स्वच्छता, बेडची व्यवस्था आणि सुरळीत पाणीपुरवठा यांवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विद्युत विभाग आणि अग्निशमन यंत्रणेची सुरक्षाविषयक मानके तपासून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

रुग्णालयातील औषध साठा आणि वैद्यकीय उपकरणांच्या साठवणूक (स्टोरेज) विभागाची पाहणी करताना बारणे यांनी औषधांच्या उपलब्धतेचा आढावा घेतला. सामान्य रुग्णांना वेळेवर औषधे मिळतील आणि कोणत्याही उपकरणाच्या अभावी उपचार थांबणार नाहीत, यासाठी योग्य नियोजन व व्यवस्थापन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

सामान्य नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हीच आमची प्राथमिक जबाबदारी आहे. वायसीएम हे शहरातील महत्त्वाचे रुग्णालय असून येथील सेवा दर्जेदार राखण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. या पाहणी दौऱ्यामुळे रुग्णालयातील अनेक प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची चिन्हे आहेत.

**- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका**

## महापौर रवि लांडगे यांचा सायकलने प्रवास

■ इंधन बचत व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा दिला नागरिकांना संदेश

**पिंपरी (दै. संध्या)**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज आपल्या निवासस्थानापासून महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत सायकलने प्रवास केला. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांनाही शक्य तिथे सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतूक आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले.

आज सकाळी महापौर रवि लांडगे हे आपल्या निवासस्थानातून सायकलवरून महापालिकेकडे रवाना झाले. शहरातील प्रमुख मार्गांवरून सायकलने प्रवास करत त्यांनी नागरिकांना इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला. यावेळी महापालिकेचे सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप अभियंता अमित दीक्षित, महापौरांचे स्वीय सहाय्यक अभय चौगुले, संदीप पालांडे हे देखील त्यांच्यासमवेत होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या संदेशातून प्रेरणा घेत आजचा हा सायकल प्रवास करण्यात आला आहे. येथून पुढे आठवड्यातून एक दिवस सायकलने प्रवास करण्याचे नियोजन आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनीही दैनंदिन जीवनात सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतूक आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकारून पर्यावरण रक्षणासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सायकलचा वापर हा केवळ इंधन बचतीसाठी नाही, तर निरोगी जीवनशैली, स्वच्छ हवा आणि पर्यावरण संवर्धनासाठीही महत्त्वाचा आहे. इंधन बचत हीच खरी राष्ट्रसेवा असून, पर्यावरणाचे संरक्षण आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे-छोटे सकारात्मक बदल करणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी प्रत्येकाने छोट्या-छोट्या सवयींमधून योगदान देण्याची गरज आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हरित उपक्रम, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी विविध मोहिमा राबवत असून, नागरिकांनीही या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन देखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी केले.

## एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

**पिंपरी (दै. संध्या)**



सीबीएसई बोर्ड इयत्ता १२ वी चा विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल लागला आहे. विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे एकूण ४१ विद्यार्थी उत्तम गुण मिळवून पास झाले आहेत. विज्ञान शाखेत दीपांशु सरकार याने ९२.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. काश्वी तन्वर हिने ९१.४ टक्के द्वितीय क्रमांक आणि एस. अनंताश्री ९१.२ टक्के तृतीय क्रमांक मिळवला आहे. चौथा क्रमांक उदय निंबोरकर ९०.८ टक्के आणि पाचवा क्रमांक सुजल कापसे ८९.२ टक्के या विद्यार्थ्यांनी मिळवला आहे. वाणिज्य शाखेत वैभव ओझा याने ९२.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. पार्थ गोयल याला ८८.८ टक्के द्वितीय क्रमांक आणि खुशी बार्गी ८७.४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयात भाव्या अंगोजी आणि खुशी बार्गी यांना १०० गुण मिळाले आहेत. तसेच इंग्रजी मध्ये कुणाल तहसीलदार ९७ गुण, गणित विषयात काश्वी तन्वर हिला ९६ गुण, भौतिक शास्त्र मध्ये दीपांशु सरकार याला भौतिक शास्त्र ९३ आणि रसायन शास्त्र मध्ये ९१ गुण, भाव्या अंगोजी हिला जीवशास्त्र मध्ये ८८ गुण, पार्थ गोयल याला अर्थशास्त्र मध्ये ९३, वैभव ओझा याला व्यावसायिक शिक्षण ९५ आणि लेखाशास्त्र मध्ये ९९ गुण मिळाले आहेत. तर म्हाळसा पराते आणि उदय निंबोरकर यांना शारीरिक शिक्षण विषयात प्रत्येकी ९६ गुण मिळाले आहेत.

## पीसीयू आणि फिडेल सॉफ्टटेक यांच्या मध्ये सामंजस्य करार




**पिंपरी (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांसोबत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण प्रणाली मध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करून विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. त्या अंतर्गत 'स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब'ची स्थापना करण्यासाठी फिडेल सॉफ्ट टेक सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार एआय सक्षम विद्यापीठ बनण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी दिली. आकुर्डी येथील ट्रस्ट कार्यालय मध्ये पीसीयू आणि फिडेल सॉफ्टटेक कंपनी यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, आयटी आणि आयटीइएस विभाग प्रमुख प्रा. रामकृष्ण वडाली आणि फिडेल सॉफ्टटेक लि. चे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## धोंडीराम सायकर यांचा मानपत्र देऊन सन्मान

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तृत्वाने मोलाची भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या धोरणानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, माजी महापौर तथा नगरसदस्या अपर्णा डोके, नगरसदस्या मनिषा चिंचवडे, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, सुरेश भोईर तसेच उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ तबलावादक धोंडीराम सायकर यांची मुले नरेंद्र सायकर, निलेश सायकर व नातू साहिल सायकर हे देखील उपस्थित होते. यावेळी मानपत्राचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत तबलावादक धोंडीराम सायकर यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय राहिले आहे. बालवयापासून संगीत साधनेशी जुळलेले त्यांचे नाते आजही अखंडपणे सुरू असून, आपल्या भावपूर्ण आणि नेमक्या तबलावादनातून त्यांनी अनेक नामवंत गायक, कलावंतांच्या मैफिली संस्मरणीय केल्या आहेत. विविध सांगीतिक व्यासपीठांवर तबल्याची प्रभावी साथसंगत करताना त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा जपली आहे. तसेच नवोदित कलाकारांना मार्गदर्शन, स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून योगदान आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्यामुळे शहराच्या सांस्कृतिक वातावरणाला त्यांनी समृद्ध केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बिबटप्रवण क्षेत्रातील नागरिकांना सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

■ बिबट दिसल्यास वन विभागाशी संपर्क साधवा-आश्विनी शिंदे

बारामती (दैनिक संध्या) : बिबट प्रवण क्षेत्रात वन विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक सूचनांचे नागरिकांनी पालन करावे; परिसरात बिबट दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन बारामतीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे यांनी केले आहे. मौजे खांडज परिसर हा निरा डावा कालवा ते निरा नदी दरम्यान बागायत पट्टा असून मोठ्या प्रमाणात दाट उसशेतीचा परिसर आहे. त्यामुळे या भागात गेल्या वर्षभरात खांडज, शिरवली व माळेगाव बु.च्या काही भागात बिबटचा वावर असल्याचे दिसून आले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव पशुधन मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. या परिसरात बिबट्याचा पुन्हा वावर दिसून आल्याने वस्तीवरील शेतकरी, ग्रामस्थ व मजूरवर्ग यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे कळताच प्रादेशिक वन विभागाच्यावतीने तात्काळ बिबट प्रवण परिसरात वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यासह रेसक्यू पथक, वनपाल, वनरक्षक मिळून नियमित रात्रगस्त, पाहणी दौरा करण्यात आहे. परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून बिबट जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावण्यात आले आहे. बिबट प्रवण परिसरात ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येत आहे. बिबट दिसल्यास नागरिकांनी घाबरू नये, नागरिकांनी बिबट्याचा पाठलाग करू नये; विशेषतः लहान मुले स्त्रिया व मजूरांनी आपली व आपल्या कुटुंबियाची काळजी घ्यावी, वन विभागाच्या ९६५७८८०८८८, ७३८७७७१०५० दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती शिंदे यांनी केले आहे.



### शिरगाव धनगरवाडी येथील सभागृह उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

■ "विकासाच्या वचनपूर्तीची दिशा स्पष्ट आहे, आणि ती दिशा समाजहितासाठी सदैव प्राधान्याने राहील— आमदार शेखर निकम

चिपळूण (दैनिक संध्या) : शिरगाव धनगरवाडी येथील सभागृहाचे उद्घाटन आमदार शेखर निकम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. आपल्या निरपेक्ष सेवा कार्यातून आमदार शेखर निकम यांनी दिलेल्या शब्दाची पूर्तता करत, धनगर समाजासाठी प्रेरणादायी कार्य केले. उद्घाटन प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी "समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव तत्पर आहोत. धनगर समाजाच्या प्रगतीसाठी भविष्यातही आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील"असे आश्वासन दिले. कार्यक्रमात सभापती सूर्यकांत खेतले, जिल्हा परिषद सदस्य नेहा रहाटे, जागृति शिंदे, बाबू साळवी, सरपंच नीता शिंदे, बंटी कोळगे, अनिल शिंदे, भाई शिंदे, संजय कदम, रुची भागडे, उमेश चिपळूणकर, नागेश सोलकर ल, बाळू शिंदे, लक्ष्मण येडगे, प्रभाकर मोरे, अशोक भागडे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण परिसरात या सभागृहाच्या उद्घाटनाने आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. धनगर समाजाच्या संस्कृतीला अभिमानाने जपणाऱ्या या सभागृहाचे लोकार्पण स्थानिकांसाठी एक अभिमानास्पद क्षण ठरला.



### एसजीआरएस कॉलेज ऑफ फार्मसीच्या मेगा प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये 14 विद्यार्थ्यांची निवड

सासवड (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड येथे दिनांक १३ मे २०२६ रोजी "मेगा कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह" उत्साहात पार पडला. नामांकित औषधनिर्माण कंपनी Emcure Pharmaceuticals यांच्या वतीने "Sales – Medical Representative" पदासाठी ही भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मुलाखतीनंतर एकूण १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अविष्कार सुधाकर जाधव, आयेशा समीर अत्तर, ऋषिकेश राजेंद्र भगत, दानिश शहाबुद्दीन अत्तर, धनश्री गाडेकर, कोमल दुयोधन बर्गल, मनोज भगवान पालवे, प्राजक्ता राजकुमार गुजरे, सानिका विवेक पवार, सोहम उत्तम काळे, अनस अ. अत्तर, अनुप प्रमोद भड, कार्तिक राजेंद्र जाधव आणि शिवम जगदाळे यांचा समावेश आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, "विद्यार्थ्यांनी केलेली मेहनत, सातत्य आणि संवाद कौशल्य यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. अशा प्लेसमेंट ड्राइव्हमुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध होत आहेत." उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार म्हणाल्या, "मेगा प्लेसमेंट ड्राइव्हमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी मिळून त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळाली आहे." प्रवेशावेळी पालकांना दिलेला शब्द पाळण्याच्या दिशेने शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, असे ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर डॉ. गणेश निगडे यांनी सांगितले. डॉ. गणेश निगडे व सौ. अंकिता जवळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, पालक व शिक्षकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### संत गाडगेबाबा प्रबोधन परिषद रविवारी

पुणे (दैनिक संध्या) : संत गाडगेबाबा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष समारोह समिती आणि संत चोखामेळा अध्यासन केंद्र यांच्यातर्फे 'दुसरी संत गाडगेबाबा प्रबोधन परिषद' रविवारी (ता.१७) आयोजित केली आहे. सोमवार पेठेतील संत गाडगेबाबा आकुल धर्मशाळा सभागृहात दुपारी चार वाजता ही परिषद होणार आहे, अशी माहिती समितीचे कार्यवाह देविदास बिनवडे, सदस्य निखिल मस्के व विनोद सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीत नवी क्रांती

## गोविंदबागेत शरद पवार साहेबांसमवेत ऊस व केळी पिकाची पाहणी

बारामती (दै. संध्या)

शरद पवार यांच्या दूरदृष्टीतून शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची नवी क्रांती आकार घेत असून, बारामती येथील गोविंदबाग शारदानगर येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) च्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ऊस व केळी पिकांची पाहणी नुकतीच उत्साहात पार पडली. यावेळी एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पिकांमध्ये होत असलेल्या सकारात्मक बदलांची सविस्तर माहिती कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ व एआय तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे यांनी उपस्थितांना दिली.

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे ऊसाची जाडी वाढणे, कांड्याचा पेरा लांब होणे, फुटव्यांचे नियंत्रण राहणे तसेच उत्पादन खर्च कमी करून अधिक गुणवत्तापूर्ण उत्पादन घेणे शक्य होत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवत शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे ध्येय समोर ठेवून पवार साहेब या वयातही अहोरात्र मेहनत घेत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा शेती क्षेत्रातील प्रगल्भ नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या शरद पवार साहेबांनी देशात फलोत्पादन क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. १९८९ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के फळबाग योजना राबवून राज्यातील गरीब शेतकऱ्यांच्या शेतात फळपिक लागवडीची क्रांती घडवून आणली. त्यानंतर केंद्रीय कृषिमंत्री पदाची धुरा सांभाळताना NHM आणि NHB योजनांद्वारे देशभर फळबाग शेती वाढीसाठी महत्त्वपूर्ण धोरणे राबविली. परिणामी महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांतून फळपिकांची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि देशाला परकीय चलन मिळण्यास मोठी मदत झाली. सेंद्रिय व विषमुक्त शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मा. युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली महाऑरगॅनिक अँड रेशेड्युफ्री फार्मर्स असोसिएशन (मोर्फा) ची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत राज्यातील शेतकऱ्यांना उत्पादन, तंत्रज्ञान व मार्केटिंगबाबत सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे.



आदरणीय साहेब यांनी मागील पाच वर्षांत सेंद्रिय व विषमुक्त शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राज्य व केंद्र शासन स्तरावर अनेक बैठका घेऊन शासन निर्णय करण्यातही मोलाचे योगदान दिले आहे.

या पिक पाहणी प्रसंगी मा. युगेंद्रदादा पवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीशमामा खोमणे, सदाशिव बापू सातव, प्रा. डॉ. दिपक पवार, कृषिभूषण प्रल्हाद वरे, गणपत देवकाते, ॲड. राजेंद्र काटे, सुशीलकुमार जगताप, गौरव जाधव, विनय शेळके, शिरूभाऊ येळे आदी मान्यवर उपस्थित होते.

देशातील तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरलेल्या शरद पवार साहेबांना मोर्फा व देशातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

# सोनाई परिवाराचे कार्य म्हणजे ग्रामीण अर्थकारणाचा आदर्श मॉडेल

जेजुरी (दै. संध्या)

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शेतीसोबत पूरक उद्योग उभारणे ही काळाची गरज असून, 'सोनाई परिवाराने' दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून उभा केलेला विकासाचा आदर्श संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काढले.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

इंदापूर ते बारामती पालखी महामार्गाच्या पाहणी दौऱ्यानिमित्त नितीन गडकरी यांनी इंदापूर तालुक्यातील गोखळी येथील 'सोनाई डेअरी'च्या मुख्य प्रकल्पाला सदिच्छा भेट दिली. यावेळी सोनाई परिवाराचे अध्यक्ष दशरथ दादा माने व प्रविणभैय्या माने यांनी त्यांचे स्वागत करून प्रकल्पाची माहिती दिली. प्रकल्प परिसराची पाहणी करताना गडकरी यांनी दुग्ध व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान, शेतकरी सहभाग, दूध प्रक्रिया व्यवस्था आणि ग्रामीण रोजगारनिर्मिती याबाबत विशेष समाधान व्यक्त केले. दशरथ माने यांच्या नेतृत्वाखाली सोनाई परिवाराने परिसरातील हजारो शेतकरी कुटुंबांना दुग्ध व्यवसायाशी जोडून त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे. शेतकऱ्यांच्या दैनंदिन उत्पन्नात वाढ, महिलांना रोजगाराच्या संधी आणि ग्रामीण भागात उद्योगाची निर्मिती या माध्यमातून सोनाई परिवाराने सामाजिक बांधिलकी जपल्याचे गडकरी यांनी नमूद केले. यावेळी बोलताना नितिन गडकरी यांनी भविष्यातील विकासाचा मंत्रही दिला. "आगामी काळ हरित ऊर्जा आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा आहे. त्यामुळे उद्योगांनी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून ऊर्जा स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी," असे ते म्हणाले. स्वतःची वीज स्वतः निर्माण करणारे प्रकल्प भविष्यात अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक ठरतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच इथेनॉल निर्मितीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, "इथेनॉल हे भविष्यातील स्वच्छ आणि पर्यावरणपूरक इंधन आहे. शेतीमालावर आधारित उद्योगांनी इथेनॉल निर्मितीकडे वळल्यास शेतकऱ्यांना अधिक आर्थिक फायदा होईल आणि देशाच्या इंधन आयातीवरील अवलंबित्वही कमी होईल."

सोनाई परिवारानेही गडकरी यांच्या मार्गदर्शनाचे स्वागत करत भविष्यात सौर ऊर्जा, इथेनॉल आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये कार्य करण्याची तयारी दर्शवली. ग्रामीण भागातील शाश्वत विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीपूरक उद्योग यांचा संगम घडवून आणण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या भेटीमुळे सोनाई डेअरीच्या कार्याला नवी दिशा मिळाली असून, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी दुग्ध व्यवसाय किती प्रभावी ठरू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी मंत्री दत्तात्रय भरणे, हर्षवर्धन पाटील, प्रदीप गारटकर, हरिश्चंद्र माने, विष्णूकुमार माने, प्रविण माने, अतुल माने आणि किशोर माने उपस्थित होते.

# कांदा चाळीत युरिया टाकून शेतकऱ्यांच्या ६०० गोणी कांद्याचे नुकसान

नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव -येडगाव रस्त्यावरील एका कांदा चाळीत अज्ञात व्यक्तीने युरिया टाकल्याने ६०० गोणी कांद्याचे नुकसान झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अशी माहिती हेमंत कोल्हे यांनी दिली.



शेतकरी सावता चिमाजी कोल्हे यांच्या मालकीच्या अडीच एकर शेतीत श्रीहरी बनकर यांनी अर्ध्या वाट्याने कांद्याची लागवड केली होती. बाजारात कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी कांदा चाळीत साठवून ठेवला होता. दोन दिवसांपूर्वी शेतकरी चाळीजवळ गेले असता परिसरात युरिया पडलेला आढळून आला. शेतकऱ्याला संशय आल्याने त्यांनी कांदा चाळ उघडून पाहणी केली असता अज्ञात व्यक्तीने चाळीवर चढून साठवलेल्या कांद्यात ओला युरिया टाकल्याचे निदर्शनास आले.या प्रकारामुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. कांदा मालकाचा कोणाशीही वाद नसताना हा प्रकार कोणी आणि कोणत्या हेतूने केला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सध्या कांद्याला समाधानकारक भाव मिळत नसल्याने शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच साठवलेल्या कांद्याचे नुकसान झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित आरोपींचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय सर्पदंश सल्लागार समितीवर डॉ. सदानंद राऊत

नारायणगाव (दै. संध्या)

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने (NCDC) सर्पदंश प्रतिबंध व नियंत्रण राष्ट्रीय कार्यक्रमासाठी राष्ट्रीय तांत्रिक सल्लागार समिती स्थापन केली आहे. या संदर्भातील कार्यालयीन आदेश दि. ८ मे रोजी जारी करण्यात आला असून भारत सरकारद्वारा स्थापित राष्ट्रीय सर्पदंश सल्लागार समितीत नारायणगाव येथील सर्पदंश तज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीच्या अध्यक्षपदी आरोग्य सेवा महासंचालक डॉ. सुनीता शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देशभरातील सर्पदंश नियंत्रण, संशोधन, उपचार पद्धती आणि



जनजागृती या विषयांवर शासनास मार्गदर्शन करण्यासाठी ही समिती कार्य करणार आहे. समितीत विविध राज्यांतील तज्ज्ञ डॉक्टर, संशोधक, विषयतज्ज्ञ, वैद्यकीय महाविद्यालयांचे प्राध्यापक तसेच जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) यांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला आहे.

# पालखी महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करा : प्रविण माने

भिगवण (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील काटेवाडी ते इंदापूर तालुक्यातील सराटी गावादरम्यान अनेक वर्षांपासून रखडलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या अपूर्ण कामाबाबत केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी प्रदीप गारटकर व युवा नेते प्रविण माने यांच्यावतीने करण्यात आली आहे.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील इतर अनेक भागांमध्ये श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम पूर्ण झालेले असताना, इंदापूर तालुक्यातील काटेवाडी ते सराटी हा महत्त्वाचा टप्पा अद्यापही अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे



स्थानिक नागरिकांसह प्रवासी, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि वारकरी यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः दरवर्षी होणाऱ्या पालखी सोहळ्यादरम्यान या मार्गावर प्रचंड गर्दी होत असते. अशा परिस्थितीत रस्त्याचे अपूर्ण काम हे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर समस्या बनले आहे. खराब आणि अपूर्ण रस्त्यामुळे वाहतूक कोंडी, धुळीचे प्रमाण, तसेच अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे.

या मार्गावर गेल्या काही वर्षांत अनेक अपघात घडले असून, त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. काही नागरिक कायमस्वरूपी अपंगत्वाला सामोरे गेले आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, बारामती तालुक्यातील काटेवाडी ते इंदापूर तालुक्यातील सराटी गावापर्यंतच्या श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे उर्वरित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागास निर्देश द्यावेत, अशी मागणी श्री गारटकर व माने यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

रस्त्याचे काम लवकर पूर्ण झाल्यास नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि वेगवान प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल तसेच अपघातांना मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या पालखी मार्गाकडे केंद्र शासनाने प्राधान्याने लक्ष द्यावे, अशीही नम्र विनंती करण्यात आली आहे.

# शिरूरमध्ये शनी जयंती उत्सवाचा भक्तिमय जल्लोष

## हजारो भाविकांनी घेतले शनिदेवांचे दर्शन

शिरूर (दै. संध्या)

शिरूर शहरातील लाटे आळी रोड परिसरात घोडनदीच्या काठावर वसलेल्या जागृत शनिमंदिरात शनी जयंती आणि शनी अमावस्येच्या दुग्धशर्करा योगानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक उत्सवाला भाविकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. शनिवारी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शिरूर शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी शनिदेवांच्या दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती. शनिदेवांच्या जयघोषाने आणि धार्मिक वातावरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.


मंदिर व्यवस्थापक रवी गोसावी यांनी गेल्या दोन दिवसांपासून अहोरात्र मेहनत घेत संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध आयोजन केले होते. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी सावलीची सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी विशेष सोय करण्यात आली होती. त्यामुळे एवढ्या मोठ्या गर्दीतही कुठेही गोंधळ निर्माण झाला नाही आणि सर्व भाविकांना शांततेत व सुलभ पद्धतीने शनिदेवांचे दर्शन घेता आले.

शनिवार, १६ मे रोजी सकाळी ठीक ८ वाजता मंदिरात मुख्य महाआरती अत्यंत भक्तिभावाने संपन्न झाली. महाआरतीनंतर भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. शनिदेवांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांनी तेल अभिषेक, पूजा-अर्चा तसेच नवस फेडण्यासाठी मंदिरात उपस्थिती लावली होती. मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सकाळपासून दुपारी ४ वाजेपर्यंत तब्बल १३ हजार भाविकांनी शनिदेवांचे दर्शन घेत पुण्यलाभ मिळवला.

उन्हाचा कडाका आणि वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने अत्यंत चोख व्यवस्था केली होती. स्वयंसेवकांनी भाविकांना वेळोवेळी मार्गदर्शन करत शिस्त राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, मंत्रोच्चार आणि भक्तीमय वातावरणामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत होता.

दोन दिवसीय उत्सवाच्या निमित्ताने रविवार, १७ मे २०२६ रोजी मंदिरात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हा महाप्रसाद कार्यक्रम होणार असून अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे.

या संपूर्ण उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी काका भोसले, सचिन गरुडे, सुनील जठार, राजेंद्र घोडके, अविनाश जाधव, सुशांत कुटे, शांतनू कोळपे, आर्यन गायकवाड, तेजस ताक, ओम जाधव आणि अदनान सय्यद यांनी विशेष परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले.



## अनुभवी अभिनेत्री सुहिता थत्ते यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल सोनाक्षी बत्रा

# “प्रत्येक दृश्यात मला काहीतरी नवीन शिकायला मिळतं”



मुंबई (दै. संध्या)

झी टीव्हीवरील ‘जगद्धात्री’ ही मालिका आपले भावनिक कथानक, थरारक वळणे आणि दमदार व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. भावनांचा, कौटुंबिक नाट्याचा आणि सस्पेन्सचा सुंदर समतोल ही या मालिकेची खासियत आहे. जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) घरात साधी आणि शांत स्वभावाची मुलगी दिसते, पण प्रत्यक्षात मात्र ती एक धाडसी गुप्त अधिकारी एजंट जेडी आहे. गुन्हेगारांसोबत सामना करताना आणि धोकादायक मोहिमा पार पाडताना ती अत्यंत आत्मविश्वासाने काम करते. मात्र, घरी तिला सावत्र आई आणि काकीकडून त्रास सहन करावा लागतो. त्या दोघी नेहमीच तिला छळतात आणि वाईट वागणूक देतात.

परंतु प्रत्येक कठीण प्रसंगी तिची आजी हीच जगद्धात्रीची मोठी ताकद आणि आधार बनली आहे. आईच्या निधनानंतर आजीनेच (सुहिता थत्ते) तिला सांभाळले असून प्रत्येक आव्हानातून तिला धीर देत पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले आहे. जगद्धात्रीच्या कुटुंबात, शिवाय व्यतिरिक्त, आजी ही एकमेव व्यक्ती आहे जिला माहिती आहे की जगद्धात्री प्रत्यक्षात एक गुप्त अधिकारी एजंट जेडी आहे. ही गोष्ट कळल्यानंतर आश्चर्यचकित किंवा नाराज न होता, आजीने जगद्धात्रीच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. त्यांनी तिची साथ दिली आणि तिचे गुपित संपूर्ण कुटुंबापासून जपले.

अलीकडेच प्रेक्षकांनी पाहिले की शिवाय (फर्मान हैदर) सोबत लग्न झाल्यानंतर आजीने बाहेरून जगद्धात्रीवर नाराजी दाखवल्यासारखे केले. पण प्रत्यक्षात मात्र त्या प्रत्येक पावलावर तिची गुपचूप मदत करत राहिल्या. प्रेक्षकांना विशेषतः जगद्धात्री आणि आजी यांच्यातील नाते खूप आवडत आहे. पडद्यावर दिसणाऱ्या त्यांच्या भावनिक प्रसंगांमधून आजी-नातीतला निरागस आणि अटूट बंध सुंदररीत्या उलगडताना दिसतो.

या भावनिक प्रसंगांबद्दल आणि ज्येष्ठ अभिनेत्री सुहिता थत्ते यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल अभिनेत्री सोनाक्षी बत्रा म्हणाली, “जगद्धात्री आणि आजी यांचे नाते हे माझ्यासाठी मालिकेतील सर्वांत सुंदर नात्यांपैकी एक आहे. आईच्या निधनानंतर आजीनेच तिची भावनिक ताकद बनून तिला आधार दिला आहे. संपूर्ण कुटुंबाला तिच्याबद्दल गैरसमज असला किंवा त्यांच्याकडून तिला अपमानास्पद वागणूक मिळत असली तरी आजी तिच्या पाठीशी शांतपणे ढाल बनून उभी राहते. त्यांचे हे निस्वार्थ प्रेमच त्यांच्या नात्याला खास आणि भावूक बनवते. अलीकडच्या कथानकात, आजीला जगद्धात्री ही गुप्त पोलिस अधिकारी आहे हे कळूनही तिने तिचे गुपित राखण्याचा निर्णय घेतला हे मला खूप भावले. कुटुंबासमोर त्या रागावल्यासारख्या वागतात, पण प्रत्येक दृश्यात त्यांचे प्रेम आणि अभिमान जाणवतो. या नात्यामध्ये मला माझ्या स्वतःच्या आजीची आठवण येते, जिचे प्रेम, आपुलकी आणि आधार माझ्या आयुष्यात खूप महत्त्वाचा आहे. सुहिता थत्ते मॅडमसोबत काम करणे माझ्यासाठी खास आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### भारतीय सैन्य दलातून सेवापूर्ती करून परतलेल्या कैलास खेसे यांचा नागरी सत्कार

पुरंदर (दैनिक संध्या) : भारतीय सैन्य दलात देशसेवा बजावून सेवापूर्ती करून गावी परतलेल्या पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील युवक कैलास रघुनाथ खेसे यांचा ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. देशसेवेचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कैलास खेसे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. त्यानंतर महिलांच्या हस्ते कैलास खेसे यांचे औक्षण करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल हंगे एस. डी., सुभेदार संपत जगताप, किरण पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना लेफ्टनंट कर्नल हंगे एस. डी. म्हणाले की, “देशसेवा ही सर्वोच्च सेवा असून सैन्यातील जवानांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी आहे. कैलास खेसे यांनी प्रामाणिकपणे देशसेवा बजावत गावाचे नाव उंचावले आहे.” तर कैलास खेसे यांनी आपल्या मनोगतात सैन्य दलातील अनुभव सांगत गावकऱ्यांनी दिलेल्या प्रेमाबद्दल व सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी अनिल शेंडगे, संतोष गायकवाड, सर्जेराव खेसे, सदाशिव चौंडकर, मोहन चौंडकर, चंद्रकांत कड, बारीकराव खेसे यांनी आपले मनोगत व्यक्त करून कैलास खेसे यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमासाठी गावातील आजी-माजी पदाधिकारी, महिला, तरुण, आजी-माजी सैनिक, परिवार, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास खेसे यांनी केले. सूत्रसंचालन निलेश अडसूळ यांनी केले तर आभार चंद्रकांत चौंडकर यांनी मानले.

### मुख्यमंत्री विजय यांच्याकडे गृह

चेन्नई (दैनिक संध्या) : तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळातील खात्यांचे वाटप आज जाहीर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री विजय यांनी गृह, पोलिस, सार्वजनिक प्रशासन, सामान्य प्रशासन, महिला व युवा कल्याण, बाल कल्याण, वृद्ध आणि दिव्यांग कल्याण, नगरविकास आणि शहरी पाणीपुरवठा ही खाती स्वतःकडे ठेवली आहेत. मंत्रिमंडळातील सर्वात तरुण मंत्री सेल्वी एस. कीर्तना यांच्याकडे उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्रालयाचा कार्यभार देण्यात आला आहे. पहिल्यांदाच मंत्री झालेल्या कीर्तना यांच्याकडे इतक्या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी सोपवल्याने तमिळनाडूच्या राजकारणात याकडे विशेष पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

# पिंपळाचं झाड तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी

## हा उपक्रम आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे - आमदार सुहास बाबर

सांगली (दै. संध्या)

■ एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु होऊन सांगली जिल्ह्यात हरित क्रांतीला प्रचंड प्रतिसाद

■ एका पिंपळाच्या झाडाच्या पुनर्वसनाच्या प्रेरणेतून आज मोठी हरित लोक चळवळ पर्यावरणात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे - आमदार सुहास बाबर



येत्या ५ जून रोजी होणाऱ्या वसुंधरा दिनानिमित्त अधिक प्रमाणात वड, पिंपळ, बहावा, करंज, चिंच अशा डेरेदार वृक्षांची लागवड सुरु आहे, त्यांच्या संगोपन आणि संवर्धनासाठी ट्री आर्मी कटिबद्ध असून जिल्ह्यातील विविध व्यक्ती, व्यापारी संघटना, संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. नोकरी धंद्यानिमित्त खानापूर आटपाडीपासून दूर राहणाऱ्या लोकांना पुन्हा एकदा आपल्या गावाशी नाळ जुळवायची असेल तर सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार सुहास बाबर यांनी केले.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.

दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी घट्ट नाळ जोडलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते होते. सांगली ग्रामीण भागातील टेंभू योजनेचे जनक असा त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात त्यांचा राजकीय वारसा मिळालेल्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ७८१७८ इतके मताधिक्य घेतले तेव्हाच त्यांनी ठरवले की आमदारकीच्या काळात मताधिक्या एवढे वृक्ष मतदारसंघात लावावेत. याबाबत बोलताना आमदार सुहास बाबर म्हणाले की एका पिंपळाच्या झाडाच्या पुनर्वसनाच्या प्रेरणेतून आज मोठी हरित लोक चळवळ खानापूर आटपाडी परिसराच्या पर्यावरणात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे.

समाज माध्यमांवर पिंपळाची गोष्ट प्रसारित केल्यानंतर त्याला मिळालेल्या तुफान प्रतिसादातून हजारो लोकं जोडली गेली आणि दररोज जोडली जात आहेत. लोकं स्वयंप्रेरणेने जागा, पाणी, झाडं, श्रमदान करण्यासाठी पुढे येत आहेत. ट्री आर्मी असं नामकरण लोकांनीच केलं असल्याचं आमदार बाबर म्हणाले. आपल्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशी ५३०० आंब्याची कलमे रुजवल्याची माहिती त्यांनी दिली. तर विटा नगरपालिकेच्या नगरसेवकाने या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून चार वर्षांची वाढलेली 52 झाडं भेट दिली तसेच आळसंद ग्रामपंचायतीने 500 झाडांचे रोपण केले आहे असे ते म्हणाले.

सांगलीचे जिल्हा प्रशासन, वन विभाग यांच्या माध्यमातून एक एकर जागेत जपानी पद्धतीचा मियावकी जंगल विकसित करण्याचे निश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. गायरान जमिनीवर, रस्त्यालगत महाराष्ट्राच्या मातीत नैसर्गिकपणे उगवणारी झाडे रुजवण्याचा उपक्रम मतदारसंघात आता सुरु आहे. पूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर "ग्रीन टनेल" वाहनचालकांना विशेषतः दुचाकीस्वारांना सावली आणि थंडावा देत पण महामार्ग आणि रस्ता रुंदीकरणामुळे हे ग्रीन टनेल नाहीसे झाले, त्याला पूर्ववत करण्याचे ध्येय ठेवल्याचे आमदार बाबर यांनी सांगितले.

## १३८ विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ

आळंदी (दै. संध्या)

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित “सुरेश वडगावकर ज्ञानदीप शिष्यवृत्ती” वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी बालवाडी ते बारावीपर्यंतच्या गरीब, गरजू व होतकरू अशा १३८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. विविध दात्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात शिक्षण आयुक्त कार्यालयाचे उपसंचालक काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, “शिष्यवृत्ती ही केवळ आर्थिक मदत नसून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आणि कुटुंबाचा विकास साधावा,” असे आवाहन केले. तसेच पालकांनी मुलांवर चांगले संस्कार घडविण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. कृषी उत्पन्न बाजार समिती खेडचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी शिक्षण क्षेत्रातील बदलत्या धोरणांवर भाष्य करत श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, डॉ.दीपक पाटील, अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, मुख्याध्यापक प्रदीप काळे, अशोक उमरगेकर, नंदकुमार वडगावकर, मनोहर दिवाणे, बाबूलाल घुंडरे, संगिता पाटील यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश मठपती यांनी केले.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेने ‘बिझनेस मल्टिप्लायर’ क्रेडिट कार्ड केले लॉन्च

मुंबई (दै. संध्या)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने संस्थापक, उद्योजक आणि व्यवसाय मालकांसाठी एफडी-समर्थित बिझनेस मल्टिप्लायर मेटल क्रेडिट कार्ड सादर केले आहे. दैनंदिन व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेल्या या प्रीमियम मेटल कार्डवर व्यवसायाचे नाव आणि कार्डधारकाचे नाव दोन्ही प्रिंट केले जातात, जे त्याच्या व्यावसायिक वापराची पुष्टी करते. व्यावसायिक खर्चासाठी स्वतंत्र क्रेडिट मर्यादेसह, बिझनेस मल्टिप्लायर क्रेडिट कार्ड व्यावसायिक आणि वैयक्तिक खर्च वेगळे ठेवण्यास मदत करू शकते.

हे कार्ड कार्यालयीन साहित्य खरेदी, डिजिटल मार्केटिंग खर्च, एसएएएस (SaaS) सबस्क्रिप्शन, व्यावसायिक प्रवास, उपकरणांची खरेदी, इन्व्हेंटरी प्रोक्योरमेंट, आंतरराष्ट्रीय विक्रेता पेमेंट्स तसेच कर्मचारी रिइम्बर्समेंट्स यांसारख्या विविध व्यावसायिक खर्चांसाठी वापरता येऊ शकते.

फिक्स्ड डिपॉझिटशी संलग्न खात्रीशीर क्रेडिट लिमिट, महत्त्वाच्या व्यावसायिक खर्च श्रेणींवर आकर्षक रिवॉर्ड्स, खर्चाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर शून्य फॉरेक्स मार्कअप यांसारख्या सुविधांसह हे कार्ड व्यवसायांना कॅश फ्लो अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास, खर्चांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यास आणि कालांतराने मजबूत क्रेडिट प्रोफाइल तयार करण्यास मदत करते.

₹50,000 पासून सुरू होणाऱ्या फिक्स्ड डिपॉझिटच्या आधारावर उपलब्ध असलेल्या या प्रीमियम मेटल कार्डसाठी ₹1,000 जॉइनिंग फी आणि ₹1,000 वार्षिक फी आकारली जाते. वार्षिक ₹5 लाख खर्च पूर्ण झाल्यास वार्षिक फी माफ केली जाते.

या लॉन्चप्रसंगी बोलताना, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे कार्ड्स, पेमेंट्स आणि लॉयल्टी विभागाचे प्रमुख श्री. शिरीष भंडारी म्हणाले, “अनेक वाढीच्या टप्प्यातील व्यवसाय अजूनही त्यांच्या दैनंदिन व्यावसायिक खर्चांसाठी डेबिट किंवा रिटेल कार्ड्सवर अवलंबून आहेत. FD-आधारित बिझनेस मल्टिप्लायर मेटल क्रेडिट कार्ड त्यांना खास व्यवसाय गरजांसाठी तयार केलेला पर्याय उपलब्ध करून देते — वर्किंग कॅपिटलसाठी लवचिक उपलब्धता, जागतिक पेमेंट्ससाठी शून्य फॉरेक्स मार्कअप, दैनंदिन व्यावसायिक खर्चांवर रिवॉर्ड्स आणि व्यवसाय विस्तारताना प्रीमियम मेटल कार्डचा विश्वास.”

## डॉ. केतन देशपांडे यांना ‘डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार’ प्रदान

पुणे (दै. संध्या)



हा सन्मान अशा प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे ज्याने प्रतिकूल परिस्थितीत मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस केले. डॉ. बी.एम.एल. मुंजाल यांच्या वारशातून मिळणारी मूल्ये आम्हाला पुढील प्रवासासाठी प्रेरणा देत राहतील.
**- डॉ. केतन देशपांडे, संस्थापक-अध्यक्ष, फ्युएल**

शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या ‘फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्ह्ज’ (फ्युएल) या संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांना मानाच्या 'डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथील ‘इंडिया हॅबिटॅट सेंटर’मध्ये आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात "शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले उत्कृष्ट प्रयत्न" या श्रेणीत त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला. हिरो ग्रुपचे संस्थापक डॉ. ब्रिजमोहन लाल मुंजाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा हा पुरस्कार समुदाय विकास आणि तळागाळातील सामाजिक बदलांसाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींना दिला जातो. रमण कांत मुंजाल फाउंडेशन आणि हिरो फ्युचर एनर्जीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पुरस्कार सोहळ्याचे हे तिसरे वर्ष होते. या सोहळ्यात शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या उत्कृष्ट प्रयत्न या श्रेणीत डॉ. केतन देशपांडे यांना डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने सन्मानित करण्यात आले. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि 1 लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरुप होते.

डॉ. केतन देशपांडे यांनी गेल्या १८ वर्षांपासून 'फ्युएल'च्या माध्यमातून वंचित आणि कुटुंबातील पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या तरुणांसाठी मोलाचे कार्य केले आहे. भारतभरातील विविध राज्यांमध्ये प्रशिक्षण, शिष्यवृत्ती आणि करिअर मार्गदर्शनाद्वारे १० लाखांहून अधिक तरुणांपर्यंत त्यांनी आपली सेवा पोहोचवली आहे. या कार्याला कॅपजेमिनी, एसबीआय फाउंडेशन, एचडीएफसी बँक, सिप्लाचे अध्यक्ष डॉ. युसूफ हमीद यांसारख्या नामांकित संस्था आणि व्यक्तींचे पाठबळ लाभले आहे. संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत २.९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना भविष्यातील कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले असून, २,९०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. या कार्याची दखल घेत डॉ. देशपांडे यांना यापूर्वी ‘चॅम्पियन्स ऑफ चेंज’ यासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ते अशोका फेलो देखील आहेत.

डॉ. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘फ्युएल’ने महाराष्ट्रात ‘फ्युएलस्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी’ची स्थापना केली आहे. राज्य शासनाने याला खाजगी कौशल्य विद्यापीठ म्हणून मान्यता दिली असून, येथे उद्योग अनुभवासोबत शैक्षणिक अभ्यासक्रम शिकवण्यावर भर दिला जातो.

## मागणी नसताना अनावश्यक प्रकल्पाचे काम करतात

सांगली (दै. संध्या)

शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असताना त्याकरीता निधीची कमतरता आहे. तसेच राज्यावर कर्जाचा डोंगर असताना देखील जनसामान्यांची मागणी नसताना अनेक अनावश्यक प्रकल्प उभारण्याचे काम चालु आहे हे चिंताजनक आहे असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांनी शासनाच्या धोरणावर नाराजी व्यक्त केली आहे.

आपल्या सोशल मीडिया हँडलवरून जयंतराव पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

कालच (१६ मे) मुंबईत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रासपचे महादेव जानकर, शिवसेना उबाठा पक्षाचे नेते विनायक राऊत, अरविंद सावंत आणि अन्य पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मोर्चा काढला होता. मात्र हा मोर्चा मंत्रालयाच्या समोर अडवण्यात आला व नेत्यांची धरपकड करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर जयंतराव पाटील म्हणाले की, राज्यात पडलेला अवकाळी पाऊस व शेतमालाला बाजारात हमीभावापेक्षा कमी मिळणारा भाव या दुहेरी संकटात सापडलेल्या आंबा, काजु, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था आज दयनीय झाली आहे. कृषी प्रधान देशात आज शेतकऱ्यांना आपल्या कष्टाने पिकविलेल्या शेतमालाला भाव मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो ही चिंतेची बाब आहे.

# काळदरीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## रोटरी क्लब ऑफ पुरंदरचा कौतुकास्पद उपक्रम

काळदरी (दै. संध्या)



काळदरी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे प्राचार्य विजय चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रिनॅमिक्स सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांच्या अर्थसहाय्याने आणि रोटरी क्लब ऑफ पुरंदर यांच्या वतीने विद्यालयातील ६० गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. "अंगी गुण असूनही केवळ आर्थिक परिस्थिती अभावी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे दुरापास्त होते. म्हणून गरीब होतकरू व गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात आली. असे प्रतिपादन मा सौ ऋतुजा भिसे यांनी केले. यावेळी ट्रिनॅमिक्स सिस्टीम प्रा. लि., मगरपट्टा, पुणे यांच्या ॲडमिन एक्झिक्युटिव्ह मा सौ ऋतुजा भिसे, रोटरी क्लब ऑफ पुरंदरचे अध्यक्ष मा श्री प्रमोद धनावडे यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ ऋतुजा भिसे यांनी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष स्व चंदुकाका जगताप यांचा विचार व वारसा पुढे चालवत शिक्षणामुळे आपण यशाचे शिखर गाठावे. आई वडील यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचे रान करत यश संपादन करा असे मत व्यक्त केले. बहुतांश वेळा विद्यार्थी शाळेतीलच असतात पण गरीब विद्यार्थ्यांकडे काहीसे दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेऊन निस्वार्थ मदत फाउंडेशनने इयत्तेची किंवा गुणवत्तेची अट न ठेवता ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले आहे त्याला मदतीचा हात देण्याचा ध्यास घेतला आहे. यात पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. या ट्रिनॅमिक्स सिस्टीम प्रा. लि., मगरपट्टा, पुणे यांच्या माध्यमातून आजवर अपघात ग्रस्त व्यक्ती, अनाथ गरजूंना वस्तूंचे तसेच कपड्यांचे वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान शिबिर, अंध अपंगांना मदत, अनाथ आश्रमात जाऊन वाढदिवस साजरे करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. या उपक्रमांनंतर आता शैक्षणिक मदत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन गरजवंतांना मदतीचा हात देऊन त्यांचे शिक्षण पुढे सुरु ठेवण्याचे आदर्श कार्य या कंपनीने हाती घेतले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची खरी गरज ओळखून ट्रिनॅमिक्स सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड कंपनी पुणे यांनी केलेली ही मदत अत्यंत मोलाची व प्रेरणादायी आहे. असे मत विद्यालयाचे आदर्श माजी विद्यार्थी तथा रोटरी क्लब ऑफ पुरंदरचे अध्यक्ष प्रमोद धनावडे यांनी व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षक पांडुरंग दुर्गाडे, प्रा संतोष नवले,शिक्षक लोकशाही आघाडीचे जिल्हा प्रतिनिधी मा श्री संजय भिंताडे, पुरंदर तालुका शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष पांडुरंग जाधव, काळदरी ग्रामपंचायतीचे आदर्श सदस्य अशोक भगत तसेच अनेक माजी विद्यार्थ्यांसोबत गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनिल घोडके, शिवाजी गोडसे, बाळू पोमणे, पंडित चेंडके,सौ सुनंदा टकले व सौ कविता शेलार यांनी परिश्रम घेतले.

## रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य
# गोविंद रावळ सर यांचे निधन



**सासवड (दै. संध्या)**

रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य व ज्येष्ठ आदर्श शिक्षक गोविंद तातोबा तथा रावळ सर (वय ९३) यांचे सासवड येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रात, विशेषतः रयत परिवारात मोठी शोककळा पसरली आहे.

सासवड येथील प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ व चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय रावळ आणि मंत्रालयातील वरिष्ठ संचालक विजय रावळ यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. रावळ सर यांनी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या थेट मार्गदर्शनाखाली सुरुवातीच्या काळात स्वावलंबी शिक्षणाचे धडे घेत गवंडी कामही केले होते. त्यानंतर उच्च शिक्षण व बीएड पूर्ण करून त्यांनी देहू, विटा, हिंगणगाव, पालवणे, पारे, हडपसर आणि परिंचे यांसारख्या दुर्गम व ग्रामीण भागातील शाळांमध्ये अनेक वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. केवळ अध्यापनच नव्हे, तर संस्थेच्या अनेक शाळांच्या इमारती उभारण्यात आणि तिथे भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

शिक्षण क्षेत्रातील दिग्गज बॅरिस्टर पी. जी. पाटील, प्रा. एन. डी. पाटील, शिवाजीराव पाटील, आनंदराव साळुंखे यांसारख्या थोर व्यक्तिमत्त्वांशी त्यांचे अत्यंत निकटचे व स्नेहाचे संबंध होते. आपल्या संपूर्ण आयुष्यात सामाजिक मूल्ये जपणा-या रावळ सरांनी मृत्यूपश्चातही समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. आपल्या मृत्यूनंतर करण्यात येणाऱ्या पारंपरिक धार्मिक विधींचा विनाकारण होणारा खर्च टाळावा आणि ती रक्कम माळीण (ता. आंबेगाव) व पालवणे येथील गरजू व गरीब मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावी, अशी अंतिम इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या या सामाजिक सुजाणतेचे व इच्छेचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांच्या जाण्याने एक ध्येयवादी शिक्षक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## हभप आनंद महाराज तांबे यांस 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार 2026' प्रदान

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : हवेली तालुका वारकरी संप्रदायाच्या वतीने श्रीक्षेत्र थेऊर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'वासंतिक चंदनउटी मोगरा आरास वारकरी भजन व संमेलन' या भव्य धार्मिक सोहळ्यात थेऊर गावचे भूषण ह.भ.प.आनंद महाराज विश्वनाथ तांबे यांना 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करुन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख निमंत्रक ह.भ.प. श्री आनंद महाराज तांबे यांनी वारकरी संप्रदाय, संत साहित्य आणि समाजप्रबोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. यावेळी सिद्ध सद्गुरु शांतिनाथजी महाराज पंढरपूर, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी श्रीक्षेत्र आळंदी देवाची विश्वस्त हभप चैतन्य महाराज कबीर, संत तुकाराम महाराज संस्थान श्रीक्षेत्र देहू माजी अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे यांचा आशीर्वाद लाभला. याप्रसंगी पंचक्रोशीतील सर्व वारकरी, भजनी मंडळे, दिंडी प्रमुख, किर्तनकार, प्रवचनकार, महिला, दिंडी प्रमुख तसेच युवक, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाचशेहून अधिक टाळकऱ्यांच्या गजरात, अभंग, भजन भक्तिरसपूर्ण वातावरणात हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. 'ज्ञानोबा- माऊली - तुकाराम' यांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. राजकीय व धार्मिक क्षेत्रातील पदाधिकारी, वारकरी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समस्त ग्रामस्थ श्रीक्षेत्र थेऊर, चिंतामणी भजनी मंडळ, महातारी आई भजनी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी परंपरेचे जतन, संत विचारांचा प्रचार आणि समाजात ऐक्याचा संदेश देणारा हा सोहळा ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थित वारकरी बांधवांनी व्यक्त केली. आयोजन समितीच्या वतीने सुंदर नियोजन केले होते आलेल्या सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

## कोयते फिरवत दहशत निर्माण करणाऱ्या बुलेट स्वारांवर गुन्हे दाखल




जेजुरी (दैनिक संध्या) : आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महा मार्गावरील पुरंदर तालुक्यातील तक्रारवाडी येथील टोल नाक्यावर बुधवार दिनांक 14 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास 40 ते 50 बुलेट व इतर दुचाकी स्वारांनी हवेत कोयते फिरवत कर्नकर्कश आवाज करून दहशत करणाऱ्या व परिसरातील नागरिकांच्या भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यावर जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जेजुरी पोलिसांनी याबाबत दिलेली माहिती अशी की बुधवार दिनांक 14 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर तक्रारवाडी टोलनाका येथे 40 ते 50 बुलेट व इतर 30 ते 40 दुचाकीवरील चालकांनी व त्यांच्या सोबत असणाऱ्या इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवून दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने हातात कोयते घेवून ते हवेत फिरवून तसेच दुचाकी गाड्यांची रेस वाढवून कर्न कर्कश आवाज करून, गाड्यांच्या सायलेन्सरमधून फटाक्या सारखा आवाज काढून शांतता भंग केली. तसेच रस्त्याच्या आजबाजूला असलेल्या चहा, स्नॅक्स चालकांच्या वर दहशत निर्माण करून त्यांची दुकाने बंद करण्यास भाग पाडले. व ही दुचाकी वाहने भरधाव वेगाने नेवून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या अनोळखी जमावांवर जेजुरी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी तपास करीत आहेत. मागील दोन महिन्यांपूर्वी पुणे च्या उपनगरातील काही तरुणांनी असाच प्रकार केला होता. जेजुरी पोलिसांनी यातील काही तरुणांना ताब्यात घेवून कारवाई केली होती. दिवे घाट व टोल नाक्यावर झालेला हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. अशा प्रकारची दहशत निर्माण करणाऱ्या टोळक्यावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी नाकरिकांकडून होत आहे.

# 'ती'च्या हाती चारचाकीचे स्टेअरिंग

**जेजुरी (दै. संध्या)**



धर्मवीर श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रामपंचायत कोथळे व श्री. शिवाजी नॉलेज सिटी संस्था, श्री मारूती ड्रायव्हिंग स्कूल यांच्या वतीने कोथळे येथील महिलांना चारचाकी वाहनांचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

15 व्या वित्त आयोगा अंतर्गत गावातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमअंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

घर, संसार, शेतीकाम यामध्ये सतत राबणाऱ्या "ती" च्या हाती चार चाकी मोटरची स्टेरिंग देण्याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आल्याने महिला वर्ग समाधानी झाला आहे.

महिला सक्षमीकरण आणि महिला सुरक्षितता याबाबत जनजागृती करण्यासाठी श्री. शिवाजी नॉलेज सिटी संस्थेचे अध्यक्ष पंकज साबळे श्री मारूती ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक यशवंत भोसले या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते. हा मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षण कालावधी 22 दिवसांचा असणार आहे.यामध्ये सुमारे 40 महिलांनी सहभाग घेतला आहे. या प्रशिक्षणास तरुण मुली, महिला यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. घर, संसार, मोलमजुरी या कामातून बाहेर पडून चारचाकीचे स्टेअरिंग कधी हातात पकडायला मिळेल याची कल्पनाही महिलांनी कधी केली नव्हती अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या. या प्रशिक्षणा बद्दल महिलांनी ग्रामपंचायतचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी वेळी, गावातील महिलांच्या सुरक्षितते बाबत महिलांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना सक्षम बनवण्यासाठी आपल्या कामातून हातभार लागत असल्याचे समाधान कोथळे गावच्या सरपंच श्रीमती जयश्री भोईटे यांनी व्यक्त केला, आणि पुढेही महिलांसाठी भरीव काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले..

यावेळी उपसरपंच समीर भंडलकर, ग्रामविकास अधिकारी रवींद्र पिसे , ग्रामपंचायत सदस्य अलका जगताप मीना जगताप. रिद्धी दोडके,नेहा झगडे, नेत्राली काकडे, अनिल जगताप,गोरख तात्या जगताप,अभिषेक जगताप, गावातील महिला प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.



## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी सह्याद्री प्रतिष्ठानचे नगरपरिषदेला निवेदन

**शिरूर (दै. संध्या)**

सह्याद्री प्रतिष्ठान शिरूर यांच्या वतीने शिरूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांना धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिरूर शहरात भव्य स्मारक उभारण्याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम आणि बलिदान हे पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी शिरूर शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी निवेदन स्वीकारून या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष मितेश गादिया, नगरसेवक सुनील जाधव, संतोष थेऊरकर, सागर नरवडे, निलेश गाडेकर, निलेश पवार तसेच नगरसेविका रिंकू जगताप, सुनीता कुरुंदळे, स्वीटी शिंदे, सुनीता भुजबळ, आयेशा सय्यद, स्वाती साठे व संगीता मल्लाव उपस्थित होते. तसेच सह्याद्री प्रतिष्ठानचे कृणाल काळे, सुनील इंदुलकर, सागर परभणे व विकास सांबारे यांच्यासह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागापूर येथे शेतकऱ्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू

**निरगुडसर (दै. संध्या)**

नागापूर (ता. आंबेगाव) येथील मीना नदीवरील असलेला कृषीपंप सुरू करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार (ता. १५) रोजी सायंकाळी उघडकीस आली. अशोक विश्वनाथ निकम (वय-४४) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक निकम हे आपल्या शेतासाठी मीनानदीकाठावरील कृषी पंप सुरू करण्यासाठी शुक्रवारी दुपारी गेले होते. परंतु सायंकाळ पर्यंत ते घरी न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता नदीकाठच्या इंजिनघरात ते पालथ्या अवस्थेत मिळून आले.

या घटनेची माहिती मिळताच नागापूर परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य करत जखमी शेतकऱ्याला रुग्णालयात हलविण्यास सहकार्य केले. रुग्णवाहिकाद्वारे निकम यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय मंचर येथे दाखल केले,मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

थोरांदळे गावात एक दिवस अगोदर गुरुवार (ता. १४) रोजी विजेचा धक्का लागून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच नागापूर येथेही अशीच घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आंबेगाव तालुक्यात दोन महिन्यात विजेचा धक्का लागून मृत्यू होण्याची ही तिसरी घटना असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

## 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात संपन्न

*नागरिकांच्या महसुली प्रश्नांना मिळाले तत्काळ निराकरण; विविध शासकीय योजनांचा लाभ*

**शिरूर (दै. संध्या)**



रांजणगाव गणपती येथील मोरया मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' अभियान उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाले. नागरिकांच्या विविध महसुली अडचणी, शासकीय सेवा व योजनांबाबत मार्गदर्शन करून त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत विविध महसुली सेवा व योजनांचा लाभ घेतला. अनेक प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला असून अर्जांची पडताळणी, कागदपत्रांची तपासणी तसेच नागरिकांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यात आले.

यावेळी शिरूर तालुक्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के नायब तहसीलदार सुवर्णा खरमाटे रांजणगाव पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक महादेव वाघमोडे जिल्हा परिषदेच्या सदस्या स्वाती पाचुंदकर पंचायत समितीचे सदस्य सागर देवकर भूमिअभिलेख उपअधिक्षक अमोल भोसले मंडळ अधिकारी तावरे मॅडम, तलाठी गणेश बिघोत, शारदा शिरसाठ, विकास नरवडे, मनोहर तेलंग, कपिल बोडरे, संतोष पोटावळे, पुरवठा निरीक्षक सदाशिव व्होनमाने, ,दुय्यम निबंधक बाबर यांनी शिबिरात नागरिकांशी संवाद साधला.

शिबिरात कृषी, ग्रामपंचायत, आरोग्य, वन, महावितरण, नागरी सुविधा केंद्र, समाज कल्याण, पंचायत समिती तसेच भूमी अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत आवश्यक मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये उत्पन्न दाखले, रहिवासी दाखले, एनसीएल दाखले, मंजूर फेरफार, ७/१२ वरील अपाक शेरा कमी करणे, वारस नोंदी तसेच एकूमे शेरा कमी करणे यांसंदर्भातील विविध लाभ नागरिकांना देण्यात आले. लाभार्थ्यांना संबंधित कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. याशिवाय आयुष्मान भारत योजनेची कार्डे तसेच रेशन कार्ड संदर्भातील विविध लाभांचेही वितरण करण्यात आले.

प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' अभियानास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा : आ. बाबाजी काळे

**चाकण (दै. संध्या)**



शासनाकडून विविध प्रकारच्या योजना येत असतात, त्या शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा, असे विचार खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी व्यक्त केले.

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळावा आणि महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्याकरता चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत समाधान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी आ. काळे बोलत होते. याप्रसंगी प्रांताधिकारी विक्रांत चव्हाण, तहसीलदार प्रशांत बेडसे, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, खेड तालुका उपप्रमुख मंगेश प-हाड, माजी उपसरपंच कालीदास वाडेकर, भाजपा नेते राजन परदेशी, नगरसेविका रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, स्वाती लेंडघर, साधना गोरे, एड. प्रकाश गोरे, पुनम शेवकरी, मंगेश कांडगे, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, महेश शेवकरी, अभिजीत जाधव, विशाल नायकवाडी, मंडलाधिकारी चेतन चासकर, तलाठी शाम वालेकर, माजी नगरसेवक राहुल कांडगे, दिलीप इंगवले, राजेंद्र खरमाटे, अनिल सोनवणे, सुनिता गोरे, मंगेश करपे, किरण कौटकर, श्याम राक्षे आदींसह शासकीय अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. काळे पुढे म्हणाले," चाकण सारख्या ठिकाणी चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर सर्वसामान्य नागरिकांना निश्चितच दिलासा देणारे आहे. अशा शिबिरांची नितांत गरज आहे."

या समाधान शिबीरात प्रामुख्याने प्रलंबित फेरफार, सातबारा मधील नावातील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा व आठ अ उता-यांचे वाटप करण्यात आले. उत्पन्न, रहिवासी, आणि जातीचे प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र याबाबत माहिती देण्यात आली. अकृषीक परवानगी, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा यावर चर्चा करण्यात आली. नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडे बंदी कायद्याच्या उल्लंघना बाबतच्या प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, ई मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अ कृषी परवानगी प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आली. नागरिकांसाठी मतदान कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड सक्तीचे करण्यात आले होते. नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी सर्वांचे स्वागत केले.



## पुरंदरच्या पूर्व भागात भारनियमन बंद करा; अन्यथा तीव्र आंदोलन

**पुरंदर (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात सुरू असलेल्या सततच्या भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले असून, येत्या आठ दिवसांच्या आत विजेचे भारनियमन बंद करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विठाई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. अमोल कामठे यांनी दिला. पिसर्वे येथील महावितरण सब स्टेशनसमोर नायगाव, माळशिरस, पिसर्वे, मावडी, पिंपरी, रिसे-पिसे आणि राजुरी गावांतील नागरिकांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना अमोल कामठे म्हणाले की, वारंवार होणाऱ्या वीज खंडितामुळे सर्वसामान्य जनतेचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. "महिलांना स्वयंपाक करताना अडथळे निर्माण होत आहेत, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे, तर शेतकऱ्यांची जनावरांची कामे आणि शेतीची कामे खोळंबत आहेत.असे अनेक प्रश्न आहेत. प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन भारनियमन बंद करावे," अशी मागणी त्यांनी केली. यावेळी ह.भ.प. अमोल कामठे यांनी राजेवाडी महावितरणचे अभियंता जीवन ठोंबरे यांना निवेदन देत महावितरण प्रशासनाला कडक इशारा दिला. "आठ दिवसांत परिस्थिती सुधारली नाही,तर आणखी तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासनच जबाबदार राहील," असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'माझे कविता जन्माख्यान' काव्यसंग्रहाचे दिमाखात प्रकाशन

**चाकण (दै. संध्या)**



संस्काराच्या मातीमध्ये रुजलेली, समाज कारणाच्या वादळांनी घडवलेली आणि आध्यात्मिक अनुभूतीच्या प्रकाशात फुललेल्या ' माझे कविता जन्माख्यान ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे येथे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

महाळुंगे इंगळे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वेदांताचार्य डॉ. नारायण महाराज जाधव हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष शाम पवार, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे, आमदार शंकर मांडेकर, डॉ. शिवाजीराव मोहिते, विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे अध्यक्ष कॅप्टन पराग डाके, सरपंच अर्चना महाळूंगकर

उद्योजक रोहिदास तुपे, शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख शिवाजीराव वरपे, ॲड. मुकुंदराव आवटे, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख ह.भ.प. विनोद महाराज महाळुंगकर पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोपाळ जगनाडे, दत्तात्रय गोरे, राजेंद्र शिंदे, सत्यभामा पवार, स्मिता मोरे, धनश्री गव्हाणे, प्रज्ञा बोत्रे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. मोरे यांनी यावेळी श्याम पवार, सत्यभामा पवार, प्रज्ञा बोत्रे, धनश्री गव्हाणे व स्मिता मोरे यांच्या कार्याचा गौरव केला. डॉ. मोरे पुढे म्हणाले," काव्य परंपरेत आत्मानुभव, संस्कार, समाज दायित्व आणि आध्यात्मिक शोध यांचा संगम घडवलेला असतो. काव्यसंग्रह कवितेच्या माध्यमातून घडलेला एक जीवनप्रवास आणि एक आत्मसंवाद व एका सांस्कृतिक प्रवाहाचा साक्षीदार असतो. बालपणीची निरागसता, तारुण्यातील संघर्ष शिलता आणि प्रौढत्वातील चिंतनशीलता या सर्वांचा एकत्रित आविष्कार म्हणजे माझे कविता जन्माख्यान म्हटले पाहिजे."

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्याम पवार यावेळी म्हणाले," काव्यसंग्रह हा आत्मशोधाचा प्रवास असतो. छोट्या मोठ्या संवादातूनच कविता जन्माला येत असते. काव्यसंग्रह म्हणजे एका कवीच्या अंतर्मनातून उमललेला शब्दांचा सुगंधी पुष्पहार असतो." यावेळी वरील मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

डॉ. शिवाजीराव मोहिते यांनी प्रास्ताविक केले. अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख हभप. विनोद महाराज महाळुंगकर पाटील व उद्योजक विजय बोत्रे यांनी सूत्रसंचालन केले. प्रज्ञा बोत्रे यांनी आभार मानले.